दैनिक
# जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

डिजिटल क्रांतीची नवी चळवळ
MSME - MH-33 -0714843

संबोधी
नवप्रारंभ विशेषांक

।रविवार, दि. ०५ एप्रिल २०२६। वर्ष १ ।अंक १ ।पाने १२। खासगी वितरणासाठी



शिवसेना



दैनिक
## जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स





मुख्य संपादक : मुकुंदराव शामराव नंन्नवरे

लोकशाहीचा चौथा स्तंभ बळकट करत,
जनसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी सज्ज असलेल्या 'दैनिक जन सम्राट टाईम्स' च्या
शुभप्रारंभ प्रसंगी आणि पहिल्या स्वागत अंकास मनःपूर्वक शुभेच्छा!





शुभेच्छुक ....................................

मा.ना.श्री.गुलाबरावजी पाटील
पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री महाराष्ट्र राज्य तथा
पालकमंत्री जळगांव जिल्हा

मा.श्री. प्रतापराव गुलाबरावजी पाटील
सदस्य, जिल्हा परिषद जळगांव स्थायी समिती सदस्य, जि.प., जळगांव

शुभेच्छुक : शिवसेना, युवासेना, भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजिददादा गट), आर.पी.आय. (आठवले गट) सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते

# बौद्ध धम्म चळवळ : एक सखोल आकलन

**मानवजातीच्या इतिहासात अनेक विचारधारा उदयास आल्या, परंतु करुणा, समता आणि अहिंसेचा सार्वत्रिक संदेश देणारी बौद्ध धम्म चळवळ विशेष ठरते. गौतम बुद्धांनी दिलेल्या शिकवणीवर आधारित ही चळवळ केवळ धार्मिक नसून सामाजिक, नैतिक आणि बौद्धिक परिवर्तनाची शक्ती ठरली. मानवी जीवनातील दुःख, त्याची कारणे आणि त्यावर उपाय यांचे अत्यंत साधे, पण प्रभावी विश्लेषण करून बुद्धांनी एक नवा जीवनमार्ग मानवजातीसमोर ठेवला.**



विशेष
जयसिंग वाघ
16/ अजिंठा हाऊसिंग सोसायटी, अजिंठा चौक, जळगाव, 9881928881

बौद्ध धम्माची सुरुवात आषाढ पौर्णिमेच्या दिवशी सारनाथ येथे झाली, ज्याला “धम्मचक्र प्रवर्तन” असे म्हटले जाते. बुद्धांनी आपल्या पाच शिष्यांना पहिले प्रवचन देत चार आर्यसत्ये आणि अष्टांगिक मार्ग यांचे विवेचन केले. दुःख आहे, दुःखाला कारण आहे, दुःखाचा नाश होऊ शकतो आणि त्या नाशाचा एक मार्ग आहे — या चार मूलभूत सत्यांमुळे मानवी जीवनाचा वास्तववादी दृष्टिकोन स्पष्ट झाला. अति भोग आणि अति त्याग या दोन्ही टोकांपासून दूर राहून मध्यम मार्ग स्वीकारण्याचा संदेश बुद्धांनी दिला.


धम्मचक्र प्रवर्तनानंतर बुद्धांनी भिक्खू आणि भिक्खूणी संघाची स्थापना केली. हा संघ बौद्ध धम्माच्या प्रसाराचा प्रमुख आधार ठरला. त्या काळात समाजात प्रचलित असलेल्या जातिभेद, उच्च-नीचता आणि विषमतेच्या प्रथा मोडून काढण्याचे कार्य या संघाने केले. कोणत्याही जाती-पंथातील व्यक्तीला संघात प्रवेश मिळत होता, ही त्या काळातील एक मोठी सामाजिक क्रांती होती. भिक्खूंनी देशभर भ्रमण करत बुद्धांची शिकवण लोकांपर्यंत पोहोचवली. त्यांच्या साध्या, संयमी आणि शिस्तबद्ध जीवनशैलीमुळे लोकांमध्ये नैतिकतेची जाणीव निर्माण झाली.

बौद्ध धम्माच्या प्रसारात सम्राट अशोक यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. कलिंग युद्धातील भीषण हानी पाहून अशोकांचे मन परिवर्तन झाले आणि त्यांनी बौद्ध धम्म स्वीकारला. त्यानंतर त्यांनी आपल्या राज्यकारभारात धम्माचे तत्त्व समाविष्ट केले. अहिंसा, सहिष्णुता आणि नैतिकता यांवर आधारित शासनव्यवस्था उभी करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यांनी शिलालेख आणि स्तंभलेखांद्वारे जनतेपर्यंत धम्माचा संदेश पोहोचवला.

अशोकांनी बौद्ध धम्माचा प्रसार केवळ भारतापुरता मर्यादित ठेवला नाही, तर तो जगभर पोहोचवण्याचा प्रयत्न केला. त्यांनी विविध देशांमध्ये धम्मदूत पाठवले. त्यांच्या प्रयत्नांमुळे बौद्ध धम्म श्रीलंका, म्यानमार, थायलंड, चीन आणि इतर अनेक देशांमध्ये पोहोचला. त्यामुळे बौद्ध धम्माला जागतिक स्तरावर मान्यता मिळाली.

सम्राट अशोकांचे पुत्र महेंद्र आणि कन्या संघमित्रा यांनीही बौद्ध धम्माच्या प्रसारासाठी आपले जीवन समर्पित केले. त्यांनी श्रीलंकेत जाऊन धम्माचा प्रचार केला. त्यांच्या कार्यामुळे तेथील समाजात बौद्ध संस्कृतीची मजबूत पायाभरणी झाली. आजही श्रीलंका हा बौद्ध धम्माचा एक महत्त्वाचा केंद्र म्हणून ओळखला जातो. महेंद्र आणि संघमित्रा यांचे कार्य हे त्याग, समर्पण आणि निष्ठेचे उत्तम उदाहरण आहे. बौद्ध धम्म चळवळ ही केवळ धार्मिक चळवळ नव्हती, तर सामाजिक परिवर्तनाची एक मोठी लाट होती. बुद्धांनी जातिभेदाला विरोध केला, स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कार केला आणि अंधश्रद्धांना दूर सारून तर्कशुद्ध विचारसरणीचा पुरस्कार केला. त्यांनी लोकांना स्वतः विचार करण्याची आणि स्वतःच्या कृतीची जबाबदारी घेण्याची शिकवण दिली. बौद्ध धम्माच्या शिकवणीत करुणा, मैत्री, समता आणि प्रज्ञा यांना विशेष महत्त्व आहे. “अप्प दीपो भव” म्हणजे “स्वतःचा प्रकाश स्वतः बना” हा संदेश व्यक्तीला आत्मनिर्भरतेकडे नेणारा आहे. बुद्धांनी कोणत्याही प्रकारच्या आंधळ्या श्रद्धेला प्रोत्साहन दिले नाही, तर अनुभव आणि विवेकावर आधारित जीवन जगण्याचा मार्ग दाखवला. आजच्या काळात बौद्ध धम्माचे महत्त्व अधिकच वाढले आहे. वेगवान जीवनशैली, तणाव, स्पर्धा आणि असुरक्षिततेच्या वातावरणात मानसिक शांतता आणि संतुलन राखण्यासाठी बौद्ध तत्त्वज्ञान उपयुक्त ठरते. ध्यान, विपश्यना आणि साध्या जीवनशैलीमुळे मनःशांती मिळते. समाजात वाढत चाललेली असहिष्णुता, हिंसा आणि भेदभाव यावर मात करण्यासाठी बौद्ध धम्माचा करुणा आणि अहिंसेचा संदेश अत्यंत आवश्यक आहे. पर्यावरणाच्या संरक्षणासाठीही संतुलित आणि साधे जीवन जगण्याची शिकवण महत्त्वाची ठरते.

एकूणच, बौद्ध धम्म चळवळ ही मानवतेच्या इतिहासातील एक उज्ज्वल अध्याय आहे. गौतम बुद्धांच्या शिकवणीपासून सुरू झालेली ही चळवळ सम्राट अशोकांच्या राजाश्रयामुळे जागतिक स्तरावर पोहोचली आणि आजही लाखो लोकांच्या जीवनाला दिशा देत आहे. करुणा, समता आणि प्रज्ञेच्या आधारावर उभा असलेला हा धम्म मानवाला केवळ चांगला नागरिक बनवतो असे नाही, तर एक संवेदनशील आणि जागरूक व्यक्ती घडवतो. त्यामुळे बौद्ध धम्म चळवळ ही केवळ इतिहासापुरती मर्यादित न राहता आजही तितकीच सुसंगत आणि प्रेरणादायी ठरते.









डिजिटल क्रांतीची नवी चळवळ

MSME - MH-33 -0714843

दैनिक जन सम्राट टाईम्स

सत्याचे प्राईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

संबोधी

नवप्रारंभ विशेषांक

। रविवार, दि. ०५ एप्रिल २०२६ ।


# संपादकीय



## विचारांची मशाल, प्रबोधनाची नांदी!

आज एक स्वप्न साकार होत आहे. अनेक वर्षांची तळमळ, अनेक रात्रींची जागरणे, अनेक संघर्षांची शिदोरी सोबत घेऊन आज दैनिक सम्राट टाईम्स आपल्या भेटीस येत आहे. हे केवळ एका वृत्तपत्राचे प्रकाशन नाही, ही एक विचारांची चळवळ आहे, हे एक प्रबोधनाचे पर्व आहे, हा एक ध्येयवादी समर्पणाचा प्रारंभ आहे.

आजचाच दिवस का? हा योगायोग नाही! ५ एप्रिल हा दिवस आम्ही उगाच निवडलेला नाही. या तारखेला इतिहासाच्या पानांवर अनेक सोनेरी अक्षरे कोरलेली आहेत. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात, समतेच्या लढ्यात आणि मानवी गरिमेच्या संघर्षात या दिवसाचे असाधारण महत्त्व आहे.

माजी उपपंतप्रधान, भारतरत्न बाबू जगजीवन राम यांचा आज जन्मदिवस. दलित समाजातून उठून राष्ट्रीय राजकारणाच्या सर्वोच्च शिखरापर्यंत पोहोचलेल्या या थोर नेत्याचे जीवन म्हणजेच समतेचा जिवंत पुरावा. त्यांचा हा जन्मदिवस भारतात 'समता दिन' म्हणून साजरा होतो आणि समतावादी विचारांचे दैनिक सुरू करण्यासाठी यापेक्षा योग्य मुहूर्त दुसरा कोणता असणार?

आजचाच दिवस संयुक्त राष्ट्रसंघाने 'आंतरराष्ट्रीय विवेक दिन' म्हणून घोषित केला आहे. जगभरात शांतता, प्रेम आणि सद्सद्विवेकबुद्धीची संस्कृती जोपासण्यासाठी हा दिवस पाळला जातो. आज जेव्हा जग एकीकडे तंत्रज्ञानामुळे जवळ येत आहे, आणि दुसरीकडे माणसा-माणसांमधील भावनिक, सामाजिक अंतर मात्र वाढतच चालले आहे, तेव्हा विवेकाची, सद्बुद्धीची गरज अधिक तीव्रतेने जाणवते.

आजच्याच दिवशी बेझवाडा (आजचे विजयवाडा) येथील ऐतिहासिक अधिवेशनात भारतीय राष्ट्रध्वज तिरंग्याचा सध्याचा आराखडा मान्य करण्यात आला होता. तिरंगा हा केवळ कापडाचा तुकडा नाही, तो या देशाचा आत्मा आहे, विविधतेत एकतेचे प्रतीक आहे. जातीपातीत, धर्मापंथांत, भाषांच्या वादात विखुरलेल्या या समाजाला एकसंध ठेवणारा, जोडून ठेवणारा तो एकमेव धागा आहे. त्या तिरंग्याच्या आराखड्याच्या स्वीकृतीच्या स्मृतिदिनी आम्ही नवी सुरूवात करतोय, हे आमच्यासाठी अत्यंत अभिमानास्पद आहे.

आणि आजच थोर समाजसुधारक, विदुषी पंडिता रमाबाई यांचाही स्मृतिदिन. स्त्री-शिक्षण, विधवा पुनर्वसन आणि समाजसुधारणेसाठी आयुष्य वेचणाऱ्या या असामान्य महिलेला आज आदरांजली वाहताना, त्यांच्या विचारांचा वारसा पुढे चालवण्याचा संकल्पही आम्ही करतो.एवढ्या ऐतिहासिक, प्रेरणादायी संदर्भांनी समृद्ध असलेल्या या दिवशी सम्राट टाईम्सचा जन्म होतो, हा योगायोग नाही, हे नियतीने रचलेले एक मंगल मिलन आहे.

### हे वृत्तपत्र का? कोणासाठी?

उर्दूचे महान शायर अकबर इलाहाबादी यांनी एकदा लिहिले होते —

"खींचो न कमानों को न तलवार निकालो,
जब तोप मुक़ाबिल हो तो अखबार निकालो!"


तोफेसमोरही झुकायचे नसेल, तर हातात शस्त्र नव्हे — वृत्तपत्र घ्या! हा विचार आज आम्ही प्रत्यक्षात उतरवत आहोत. आजच्या काळात जेव्हा सत्तेचे, भांडवलाचे, जातीयवादाचे आणि असहिष्णुतेचे तोफखाने सर्वत्र धुमाकूळ घालत आहेत, तेव्हा सामान्य माणसाच्या हातातील सर्वात प्रभावी हत्यार आहे लेखणी, आणि तिच्या माध्यमातून बाहेर पडणारा विवेकी, धाडसी, सत्यनिष्ठ शब्द.

आजचे जग पाहिले तर मन अस्वस्थ होते. समाज विविध कारणांनी विभागला जातो आहे. जात, धर्म, भाषा, प्रांत — प्रत्येक ठिकाणी भेदाच्या भिंती उभ्या राहत आहेत. समता आणि बंधुभावाच्या मूल्यांना दुर्लक्षिले जात आहे. मुख्य प्रवाहातील माध्यमे अनेकदा सत्तेच्या आणि भांडवलाच्या जवळ राहणे पसंत करतात. अशा वेळी समाजातील उपेक्षित, वंचित, दुर्लक्षित घटकांचा आवाज कोण बनणार?

सम्राट टाईम्स हे उत्तर आहे. मुख्य प्रवाहात अपेक्षित स्थान न मिळालेल्या समाजघटकांना — दलित, आदिवासी, महिला, श्रमिक, शेतकरी, छोटे व्यापारी, युवा — या सर्वांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे हे आमचे प्राथमिक कर्तव्य असेल. "सबका साथ, सबका विकास" ही घोषणा प्रत्यक्षात साकार व्हायची असेल, तर सर्वांचा आवाज ऐकला जाणे आवश्यक आहे — आणि तो आवाज पोहोचवण्याचे काम सम्राट टाईम्स करेल.

### आमचे विचारसूत्र, आमचा मार्गदर्शक वारसा

आम्ही ज्यांच्या विचारांवर उभे आहोत, त्या महापुरुषांची शिदोरी आम्हाला बळ देते.तथागत बुद्धांनी करुणा आणि समतेचा मार्ग दाखवला; छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेसाठी, सर्वसमावेशक न्यायासाठी स्वराज्य उभारले; महात्मा फुलेंनी सत्यशोधनाची मशाल पेटवली; राजर्षी शाहूंनी संधीची समानता प्रत्यक्षात आणली; आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या रूपाने या साऱ्या विचारांना कायद्याचे कवच चढवले — हाच पंचशील आमचा मार्गदर्शक आहे.



# खान्देशची माती आणि महामानवाचे अतूट नाते!







मुकुंदराव शामराव नंन्नवरे
संपादक -
दै. जन सम्राट टाईम्स


खान्देशची माती नेहमीच बंडखोर राहिली आहे. अहिराणी, तावडी बोलीत रुजलेला हा प्रदेश शेतकऱ्यांचा, कष्टकऱ्यांचा, आदिवासींचा आणि सामाजिक न्यायाच्या लढ्याचाही भूमिपुत्र राहिला आहे. अशा या खान्देशी मातीशी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाते केवळ एखाद-दुसऱ्या सभेपुरते मर्यादित नव्हते. ते नाते होते श्रद्धेचे, संघर्षाचे, आणि आत्मसन्मानाच्या जागृतीचे. जळगाव जिल्ह्याची भूमी बाबासाहेबांच्या पाऊलखुणांनी पुनीत झाली आहे. त्या भेटी, त्या सभा, ते प्रसंग — आज इतिहासाची अमूल्य संचिती आहेत. प्रत्येक भेटीमागे एक कारण होते, एक उद्देश होता आणि प्रत्येक वेळी त्या भूमीवर समतेची, न्यायाची एक नवी बीजे पेरली गेली.

### आसोदा, जळगाव तालुका — जुलै १९२६

### राज्यातील पहिल्या दलित सरपंचाच्या गावास बाबासाहेबांची ऐतिहासिक भेट

इतिहासात काही घटना इतक्या प्रतीकात्मक असतात की, त्यांचे महत्त्व काळाबरोबर अधिकच वाढत जाते. जळगाव तालुक्यातील आसोदा या गावाने महाराष्ट्राच्या इतिहासात एक मानाचा मुकुट परिधान केला. राज्यातील अनुसूचित जातीचे पहिले सरपंच जळगाव तालुक्यातील आसोदा या गावात झाले होते — धनजी रामचंद्र बिन्हाडे हे वृत्त जेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना कळले, तेव्हा त्यांनी क्षणाचाही विलंब न करता या गावाला भेट देण्याचा निर्णय घेतला. जुलै १९२६ च्या या ऐतिहासिक भेटीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी गावातील वाड्यात दौलतराव पाटील, मोतीराम पाटील यांच्या घरी तब्बल तीन दिवस वास्तव्य केले. ही केवळ औपचारिक भेट नव्हती. बाबासाहेब गावकऱ्यांच्या घरी गेले, त्यांच्याशी बोलले, त्यांचे सुख-दुःख जाणून घेतले. तीन दिवसांच्या या मुक्कामात डॉ. बाबासाहेब आंबेडकर गावकऱ्यांच्या घरी गेले आणि मोठ्या आनंदात त्यांनी चटणी-भाकर-ठेचा खाल्ल्याच्या आठवणी गावकरी सांगतात. एवढेच नाही, या भेटीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी गावातील तीन विहिरी देखील सर्वांसाठी खुल्या केल्या होत्या, असे जुने जाणकार सांगतात. विहिरी खुल्या करणे — हे प्रतीक किती गहिरे आहे! ज्या समाजाला शतकानुशतके पाण्यापासूनही वंचित ठेवण्यात आले होते, त्यांच्यासाठी सार्वजनिक विहिरी मुक्त करणे म्हणजे केवळ पाण्याचा नळ उघडणे नव्हते — ते होते माणुसकीचा दरवाजा उघडणे. १९२७ च्या महाड सत्याग्रहापूर्वीच बाबासाहेबांनी आसोद्यात हे धाडस केले होते, हे आजवर फारसे चर्चिले गेले नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तीन दिवसांच्या भेटीसंदर्भातल्या आठवणी आजही गावकऱ्यांना प्रेरणा देतात. शंभर वर्षे उलटून गेली, पण आसोद्याच्या मातीत त्या आठवणी अजूनही जिवंत आहेत.

### चाळीसगाव — एक अतूट ऋणानुबंध; बाबासाहेबांचे बहुआयामी नाते

जर जळगाव जिल्ह्यातील कोणत्या एका शहराचे बाबासाहेबांशी सर्वाधिक गहिरे नाते सांगायचे असेल, तर ते निःसंशय चाळीसगाव आहे. चाळीसगाव व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ऋणानुबंध अतूट असे होते. त्यामुळे ते अनेकवेळा चाळीसगावी येऊन गेले.

### दिनबंधू आंबेडकर आश्रम — १९२७

चाळीसगावशी बाबासाहेबांचे नाते केवळ भेटींपुरते नव्हते, तर त्यांनी इथे एक संस्था उभी करण्यातही सक्रिय सहभाग घेतला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेने व सहभागाने १९२७ मध्ये चाळीसगावातील तेव्हाच्या दोस्त थिएटरजवळ दिनबंधू आंबेडकर आश्रम या संस्थेची स्थापना करण्यात आली होती. डॉ. बाबासाहेब यांची प्रेरणा घेऊन दिवाण चव्हाण, ॲड. डी. आर. झाल्टे, डी. डी. चव्हाण, भगवान बागुल गुरुजी, यशवंत जाधव, पुंडलिक वाघ, सखाराम मोरे यांनी दिनबंधू आंबेडकर आश्रमाची स्थापना केली होती. हे कार्यकर्ते म्हणजे खान्देशातील आंबेडकरी चळवळीचे खरे शिलेदार होते. बाबासाहेबांच्या विचाराची बीजे रोवण्यासाठी त्यांनी आयुष्य वेचले. दिनबंधू आंबेडकर आश्रम म्हणजे केवळ इमारत नव्हती — ती होती खानदेशातील दलित-वंचित मुलांच्या शिक्षणाची, जागृतीची पहिली ठिणगी.

### टांग्याचा अपघात — एक अविस्मरणीय प्रसंग

चाळीसगावशी बाबासाहेबांचे नाते एका वेदनादायी पण मार्मिक प्रसंगानेही जोडलेले आहे. चाळीसगावात टांगा अपघातात बाबासाहेब गंभीर जखमी झाल्यामुळे अनेक दिवस त्यांचे वास्तव्य चाळीसगावात होते. (पान ४ वर)


सस्नेह निमंत्रण

दैनिक जन सम्राट टाईम्स

सत्याचे प्राईम्स

## नवप्रारंभ सोहळा

सप्रेम नमस्कार

मा. श्री. सौ. ____________________

____________________

माना की अखबार की लाईफ एक दिन की होती हैं। मगर उसका असर सालों तक रहता हैं। वंचित, शोषित आणि पीडितांचा निर्भीड आवाज बनलेले **दैनिक जन सम्राट टाईम्स** आता उत्कृष्ट मांडणी, अभिनव प्रयोग आणि डिजिटल क्रांतीच्या नव्या वाटचालीसह सज्ज झाले आहे.

या दैनिकाच्या नव्या प्रारंभ अंकाचा प्रकाशन व उद्घाटन सोहळा **रविवार, दिनांक ५ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजता** आयोजित करण्यात आला आहे.



उद्घाटक

माननीय भाऊसो नामदार गुलाबरावजी पाटील साहेब

पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री जळगाव जिल्हा शिवसेना नेते महाराष्ट्र राज्य.



प्रमुख उपस्थिती

डॉक्टर श्रीकांतजी शिंदे साहेब

खासदार तथा शिवसेना नेते महाराष्ट्र राज्य



प्रमुख उपस्थिती

माननीय श्री. आंनंदराजजी आंबेडकर साहेब

राष्ट्रीय अध्यक्ष रिपब्लिकन सेना तथा सभापती बौद्धजन पंचायत समिती महाराष्ट्र राज्य

प्रमुख अतिथी

डॉ. बालाजी किनीकर
आमदार, अंबरनाथ विधानसभा

मा. विश्वनाथ भोईर
आमदार, कल्याण विधानसभा

मा किसन कथोरे
आमदार, मुरबाड विधानसभा

मा. सुलभाताई गणपत गायकवाड
आमदार कल्याण (पूर्व)

मा. अशोकभाऊ जैन,
उद्योजक, जळगांव

मुख्य कार्यालय पत्ता : दैनिक जन सम्राट टाईम्स सिद्धेश्वर हाईट, बी - ऑफिस नंबर 112 रेल्वे स्टेशन जवळ मांडा टिटवाळा (पश्चिम) पिन कोड 421 605

संपादक : मुकुंदराव शामराव नंन्नवरे 91 93254 87889

(पान 3 वरून)

त्यांनी या आठवणी पुस्तकात लिहिल्या आहेत. डॉ. बाबासाहेबांचे खाजगी सचिव ननकचंद दत्तू यांनी लिहिलेल्या 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुभव व आठवणी' या पुस्तकात चाळीसगाव येथील सत्कार व टांग्यातून पडून झालेल्या अपघाताबद्दल लिहिले आहे. एक महामानव, ज्यांच्या खांद्यावर कोट्यवधी वंचितांचे भवितव्य होते, ते चाळीसगावच्या रस्त्यावर जखमी झाले आणि इथल्याच मातीने, इथल्याच माणसांनी त्यांची सेवा केली — हा इतिहास चाळीसगावच्या वाटचालीत एक सुवर्णक्षण म्हणून नोंदलेला आहे.

**ऐतिहासिक सभा — १७ जून १९३८**

१७ जून १९३८ रोजी सायंकाळी ५ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आश्रमशाळेसमोर मोठी सभा झाली होती. हा काळ बाबासाहेबांच्या कारकिर्दीतील अत्यंत महत्त्वाचा होता. स्वतंत्र मजूर पक्षाची (इंडिपेंडंट लेबर पार्टी) स्थापना १९३६ मध्ये झाली होती, आणि बाबासाहेब महाराष्ट्रभर संघटन बांधत फिरत होते. चाळीसगावच्या सभेत हजारो खान्देशी बांधव एकत्र आले आणि बाबासाहेबांचे शब्द ऐकले. त्या शब्दांनी खान्देशातील आंबेडकरी चळवळीला नवी उभारी दिली.

**सत्कार आणि थैली — १९५१**

१९५१ मध्ये चाळीसगावच्या राष्ट्रीय विद्यालयाच्या प्रांगणात डॉ. बाबासाहेब यांचा सत्कार करण्यात आला होता. त्याप्रसंगी त्यांना २,००१ रुपये थैलीही अर्पण करण्यात आली होती. स्वातंत्र्यानंतरही बाबासाहेबांचे चाळीसगावशी नाते कायम राहिले. संविधानाचे शिल्पकार म्हणून त्यांचे नाव आता जगभर झळकत होते, पण खान्देशातील त्यांच्या लोकांनी त्यांना मनापासून जपले होते.

'बहिष्कृत भारत'मध्ये चाळीसगावचा उल्लेख बहिष्कृत भारत या वृत्तपत्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी चाळीसगावातील सभा, सत्कार व अनुभव तसेच दिनबंधू आंबेडकर आश्रमाबाबत लिखाण केले होते. बाबासाहेबांनी स्वतः चाळीसगावाबद्दल लिहिणे हे किती अपूर्व आहे! 'बहिष्कृत भारत' हे त्यांचे वृत्तपत्र होते आणि त्यात खानदेशातील चाळीसगावचा उल्लेख येणे म्हणजे या गावाने केलेल्या कार्याला बाबासाहेबांनी राष्ट्रीय व्यासपीठावर मांडले होते.

**अस्थींचे विसर्जन — अंतिम ऋणानुबंध**

बाबासाहेबांच्या निधनानंतरही चाळीसगावचे त्यांच्याशी नाते कायम राहिले. आंबेडकर नगरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या ठिकाणी त्यांच्या अस्थिकलशातील काही अस्थींचे विसर्जन करून पुतळ्याची पायाभरणी झाली आहे हे विशेष होय. ज्या भूमीत बाबासाहेब जगले, जिथे त्यांनी विचाराची बीजे पेरली, त्याच भूमीत त्यांच्या अस्थीही विसावल्या. यापेक्षा अधिक पवित्र ऋणानुबंध कोणता असेल?

**मक्रणपूर/मकरंदपूर — डिसेंबर १९३८**

'जय भीम'चा पहिला जयघोष — इतिहासाचे एक सोनेरी पान हा प्रसंग जळगाव-औरंगाबाद सीमेवरील आहे, पण त्याचा थेट संबंध चाळीसगाव तालुक्याशी आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील कन्नड तालुक्यात मक्रणपूर गावात १९३८ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची एक ऐतिहासिक सभा झाली. आंबेडकर यांचे अत्यंत विश्वासू मानले जाणारे भाऊसाहेब मोरे यांनी सभा संपल्यानंतर 'जयभीम' असा जयघोष केला. त्यांनी ही दलित परिषद ब्रिटिश आमदनीतील चाळीसगाव तालुक्यातील कन्नडच्या सीमेवर असलेल्या मक्रणपूर (डांगरा) या गावी आयोजित केली. याचे कारण असे होते की, निझाम सरकारने मराठवाड्यात बाबासाहेबांना सभा घेण्यास मज्जाव केला. त्यांच्या सभेवर बंदी झाली. पण मराठवाड्यातली अत्यंत महत्त्वाची परिषद कोणत्याही स्थितीत पार पाडायचीच, असा निग्रह भाऊसाहेब मोरे, श्यामराव जाधव आणि इतर सहकाऱ्यांनी केला. निझामाच्या बंदीला धुडकावून, ब्रिटिश हद्दीतील चाळीसगाव तालुक्याच्या सीमेवर परिषद घेतली आणि तिथेच भाऊसाहेब मोरे यांनी सभा संपल्यानंतर 'जयभीम' असा नारा दिला. यापुढे दलित बांधवांनी एकमेकांना भेटल्यावर याच शब्दाने अभिवादन करायचे, असे ठरले.

विचार करा — आज जगभरातील कोट्यवधी आंबेडकरी अनुयायी ज्या 'जय भीम'ने एकमेकांना अभिवादन करतात, त्या घोषणेचा जन्म खान्देश-मराठवाडा सीमेवर झाला! जळगाव जिल्ह्याच्या चाळीसगाव तालुक्याशी या ऐतिहासिक घटनेचे नाते आहे, हे किती अभिमानाची गोष्ट आहे!



**धुळे (पूर्वीचे पश्चिम खान्देश) — खान्देशाशी व्यापक संबंध**

बाबासाहेबांचे खान्देशाशी असलेले नाते जळगाव जिल्ह्यापुरते सीमित नव्हते. शेजारच्या धुळे जिल्ह्यावरही त्यांच्या पाऊलखुणा आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्यांच्या ६५ वर्षांच्या आयुष्यात धुळ्यात दोन वेळा आले होते. पहिल्यांदा डॉ. आंबेडकर २९ ते ३१ जुलै १९३७ ला धुळ्यात आले होते. त्यानंतर १७ जून १९३८ ला धुळ्यात आले होते. बाबासाहेब धुळ्यात येणार असल्याची बातमी सर्वदूर पोहोचल्याने खानदेशातल्या गावागावातून पहाटे चारपासून शेकडो नागरिकांचे जत्थे धुळ्यातील रेल्वेस्थानकाजवळ जमा होऊ लागले होते. यावरून लक्षात येते की, संपूर्ण खान्देशात— जळगाव, धुळे, नंदुरबार — बाबासाहेबांच्या विचाराचे किती मोठे जाळे होते. एका नेत्याच्या येण्याच्या बातमीने रात्रीपासून जत्थे निघत होते — हे श्रद्धेचे नव्हे, तर विश्वासाचे, आत्मसन्मानाच्या जागृतीचे प्रतीक होते.

**खान्देशातील आंबेडकरी चळवळीचा वारसा**

बाबासाहेबांच्या या भेटींचे परिणाम दूरगामी होते. जळगाव जिल्ह्यात त्यांनी जी बीजे पेरली, त्यातून उगवलेले रोपटे आज वटवृक्ष बनले आहे.

**शिक्षणाचे महत्त्व — बाबासाहेबांनी**

चाळीसगावातून, आसोद्यातून जे सांगितले, शिका, शिकवा, जागे व्हा! त्याचे प्रतिबिंब आज जळगाव जिल्ह्यातील असंख्य डॉ. आंबेडकर महाविद्यालये, शाळा, वसतिगृहांमध्ये दिसते.

**संघटनाचे बळ — दिनबंधू आंबेडकर**

आश्रमापासून सुरू झालेली संघटनाची परंपरा आज रिपब्लिकन पक्षाच्या विविध गटांच्या रूपाने, बौद्ध समाजाच्या संघटनांच्या रूपाने कार्यरत आहे सामाजिक न्यायाचे आंदोलन — आसोद्यातील पहिल्या दलित सरपंचापासून ते आजच्या जिल्हा परिषदेतील अनुसूचित जाती-जमातींच्या प्रतिनिधींपर्यंत हा प्रवास बाबासाहेबांनी इथेच पेरलेल्या विचाराचे फलित आहे.








दैनिक
# जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स

मुख्य संपादक : **मुकुंदराव शामराव नंन्नवरे**

## दैनिक
## जनसम्राट टाईम्सच्या

नवीन प्रारंभ व स्वागत अंकानिमित्त मनःपूर्वक

# हार्दिक शुभेच्छा..!

आपल्या वृत्तपत्राच्या माध्यमातून
समाजातील घडामोडी, सत्य व निष्पक्ष बातम्या
लोकांपर्यंत पोहोचोत हीच सदिच्छा..!

आपल्या उज्ज्वल वाटचालीस खूप खूप शुभेच्छा!



: शुभेच्छुक :

SK cotton — M/S S.K. COTTON INDUSTRIES
AMS GOLD — AMS OILS MILLS LLP
EVERGREEN COTTON — EVERGREEN COTTON
Bharat Petroleum — KADRI PETROLEUM
Bharat Petroleum — GOODLUCK PETROLEUM

iconic realities — We Build Future
SK ENTERPRISES
MS REALITIES — Built To Perfection
UNITYWELL — the safest place for your stuff...

malhar.org 93700 77311

# रक्ताचं पाणी केलेल्या मातीचा हुंदका!



निसर्ग कधी ‘वरुणराजा’ होऊन जमिनीची तहान भागवतो, तर कधी ‘काळपुरुष’ होऊन घात करतो. गेल्या काही दिवसांत महाराष्ट्राच्या नशिबाने जे वळण घेतलं आहे, ते पाहून काळजाचा ठोका चुकावा. आभाळ फाटलंय असं म्हणतात, पण इथे तर शेतकऱ्याचं नशीबच फाटलं आहे. ज्या मातीने सोन्यासारखं पीक उगवलं होतं, त्याच मातीत आज शेतकऱ्याची स्वप्नं चिखलात कालवली गेली आहेत.

### हातातोंडाशी आलेला घास मातीत

शेतात डोलणारा गहू, काढणीला आलेला हरभरा आणि रानात साठवून ठेवलेला कांदा... हे केवळ पीक नव्हतं, तर एका कुटुंबाचं वर्षभराचं रेशन होतं, लेकीच्या लग्नाचं हुंडा होतं आणि म्हाताऱ्या आई-बापाच्या औषधाचं पाकीट होतं. पण अवकाळी पावसाच्या एका तडाख्याने आणि गारांच्या वर्षावाने सगळं उद्ध्वस्त केलं.

आज महाराष्ट्राच्या कोणत्याही कोपऱ्यात जा, चित्र सारखंच आहे. ‘चांदा ते बांदा’ बळीराजाच्या डोळ्यांत फक्त पाणी आहे. कुठे गव्हाच्या लोंब्या जमिनीला टेकल्या आहेत, तर कुठे कांदा सडून त्याचा उग्र वास वातावरणात पसरला आहे. कोकणात ज्या आंब्याच्या मोहोराकडे बघून शेतकरी सुखावला होता, तो मोहोर आज गळून मातीत मिसळला आहे. काजूच्या बागांची तर दयनीय अवस्था झाली आहे. हा निसर्गाचा कोप आहे की शेतकऱ्याच्या नशिबाचा अटळ शाप?

### जगण्याचं गणित आणि युद्धाची झळ

शेतकऱ्याचं जगणं आधीच ‘तोल मोलाचे’ असते. त्यात भर म्हणून की काय, जागतिक राजकारणाचे पडसाद त्याच्या शेतात उमटत आहेत. आखाती युद्धाच्या छायेत निर्यातीचे मार्ग रोखले गेले आहेत, डिझेल-खतांचे भाव गगनाला भिडले आहेत. पण जेव्हा हाच शेतकरी आपला माल बाजारात नेतो, तेव्हा त्याला मिळणारा भाव हा त्याच्या घामाच्या थेंबापेक्षाही स्वस्त असतो. "ज्या देशाला अन्नदाता म्हणतो, त्या दात्याच्या पदरात आज फक्त भीक उरली आहे का?" हा प्रश्न आज प्रत्येक संवेदनशील मनाला पडायला हवा.



बळीराजा
शैलेंद्र चव्हाण
: संपादक :
ॲग्रोवर्ल्ड, जळगाव

राज्यकर्त्यांनो, खुर्च्या उबदार आहेत, पण माती गारठली आहे!

मंत्रालयाच्या वातानुकूलित दालनात बसून पंचनाम्यांचे आदेश देणं सोपं असतं. पण ज्याच्या घराचं छप्पर उडालंय आणि ज्याचं वर्षभराचं कष्ट डोळ्यांदेखत वाहून गेलंय, त्याला त्या कागदी घोड्यांचा आधार वाटत नाही. केवळ मदतीची घोषणा करून प्रश्न सुटणार नाहीत. ही वेळ राजकारण करण्याची नाही, तर त्या मातीच्या लेकाला सावरण्याची आहे.

सत्तेच्या सारीपाटावर कोणाचं पारडं जड आहे, यापेक्षा शेतकऱ्याचं पारडं आज पूर्णपणे रिकामं आहे, याकडे लक्ष द्या. साहेब, तो शेतकरी आहे म्हणून आपण आहोत. जर तोच उभा राहिला नाही, तर तुमच्या प्रगतीच्या गप्पा आणि विकासाची स्वप्नं कोणत्या पायावर उभी करणार?

बळीराजाला पुन्हा कसं उभं करायचं? नव्या हंगामाची चाहूल लागतेय, पण बळीराजाकडे बियाणं घ्यायलाही पैसे उरलेले नाहीत. कर्जाचा डोंगर हिमालयापेक्षा मोठा झाला आहे. अशा वेळी समाजाचे आणि सरकारचे उत्तरदायित्व काय?

* केवळ सानुग्रह अनुदान नको, तर कर्जमुक्तीचा ठोस आधार हवा.

* विमा कंपन्यांच्या जाचक अटींतून शेतकऱ्याची सुटका हवी. * शेतमालाला हमीभाव नाही, तर 'सन्मानभाव' मिळायला हवा.

शेवटचा शब्द...

शेतकरी कधीच कोणासमोर हात पसरत नाही, तो फक्त निसर्गाकडे आणि सरकारकडे न्यायाची अपेक्षा करतो. आज त्याच्या डोळ्यांतील अश्रू हे केवळ पावसाचे पाणी नाही, तर ते त्याच्या अस्तित्वाचं विसर्जन आहे. जर आपण आज त्याला सावरलं नाही, तर उद्याच्या अन्नाच्या प्रत्येक कणासोबत आपल्याला त्याच्या शापाचाही वाटा उचलावा लागेल.

हे सरकारचे कर्तव्य आहे आणि समाजाचे ऋण.

बळीराजाला पुन्हा उभं करण्यासाठी केवळ मदतीचा हात नको, तर माणुसकीची साथ हवी आहे!







# नोबल इंटरनॅशनल स्कूल : ग्रामीण शिक्षणातील आधुनिकतेचा दीपस्तंभ

## गुणवत्तापूर्ण शिक्षण, संस्कार आणि सामाजिक जाण यांचा संगम घडवणारी प्रेरणादायी संस्था



धरणगाव तालुक्यातील पाळधी या छोट्याशा गावात उभी राहिलेली नोबल इंटरनॅशनल स्कूल आज ग्रामीण शिक्षणाचा चेहरामोहरा बदलणारी संस्था म्हणून ओळखली जाते. शिक्षण म्हणजे केवळ पाठ्यपुस्तकातील ज्ञान नव्हे, तर व्यक्तिमत्व विकास, सामाजिक जबाबदारी आणि मूल्यांची जपणूक असा व्यापक दृष्टिकोन या शाळेने स्वीकारला आहे. त्यामुळेच ही संस्था ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी आशेचा किरण ठरत आहे.

या संस्थेच्या यशामागे आहेत संचालिका डॉ. अर्चना प्रशांत सूर्यवंशी, ज्यांनी शिक्षण क्षेत्रात केवळ एक शाळा उभी केली नाही, तर एक विचार, एक संस्कार आणि एक दिशा निर्माण केली. त्यांच्या नेतृत्वाखाली नोबल इंटरनॅशनल स्कूल आज ६०० हून अधिक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक आणि नैतिक घडण घडवणारे केंद्र बनले आहे.

### संकल्प ते साकार : शाळेची प्रेरणादायी सुरुवात

डॉ. अर्चना सूर्यवंशी यांना स्वतःची शाळा सुरू करण्याची प्रेरणा शिक्षिका म्हणून काम करत असतानाच मिळाली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाची संधी मिळावी, हा त्यांचा ध्यास होता. पती प्रशांत सूर्यवंशी यांच्या पाठिंब्याने त्यांनी ८ मार्च २०१० रोजी, जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून, पाळधी येथे नोबल इंटरनॅशनल स्कूलची स्थापना केली.



पहिल्याच वर्षी १०५ विद्यार्थ्यांची नोंदणी झाली आणि पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद इतका मोठा होता की 'ॲडमिशन क्लोज'चा फलक लावावा लागला. हेच शाळेच्या गुणवत्तेचे पहिले यश ठरले.

आज शाळेत ६०० पेक्षा अधिक विद्यार्थी, ३० अनुभवी शिक्षक आणि आधुनिक सुविधांनी सुसज्ज अशी व्यवस्था आहे. १० शालेय बसेसद्वारे विद्यार्थ्यांना सुरक्षित ने-आण सुविधा पुरवली जाते.

### गुणवत्तेचं आणि संस्कारांचं शिक्षण

नोबल इंटरनॅशनल स्कूलची ओळख केवळ अभ्यासापुरती मर्यादित नाही. येथे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर विशेष भर दिला जातो.

### डिजिटल - आधुनिक शिक्षण पद्धतीचा अवलंब

- ॲक्टिव्हिटी बेस्ड लर्निंगमुळे विद्यार्थ्यांची समज वाढविणे
- खेळ, कला, संगीत, विज्ञान प्रदर्शन यांसारख्या
- उपक्रमांमुळे सर्जनशीलतेला वाव
- शिक्षकांचे नियमित प्रशिक्षण
- वैद्यकीय तपासणी व आरोग्य जागरूकता

या सर्व गोष्टी शाळेला एक संपूर्ण शिक्षणसंस्था बनवतात. येथे विद्यार्थ्यांना केवळ गुण मिळवण्यापेक्षा चांगला माणूस बनण्याची शिकवण दिली जाते.

### ग्रामीण शिक्षणाला नवी दिशा

नोबल इंटरनॅशनल स्कूलने हे सिद्ध करून दाखवले आहे की उत्कृष्ट शिक्षणासाठी मोठे शहर किंवा मोठा खर्च आवश्यक नसतो. योग्य दृष्टिकोन, प्रामाणिक प्रयत्न आणि समर्पण यामुळे ग्रामीण भागातही जागतिक दर्जाचे शिक्षण देता येते.

या शाळेतील अनेक विद्यार्थी राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये यश मिळवत आहेत. त्यांच्या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळते.

### सामाजिक जबाबदारीची जाणीव

- नोबल इंटरनॅशनल स्कूल केवळ शिक्षणापुरती
- मर्यादित नसून सामाजिक कार्यातही सक्रिय आहे.
- दरवर्षी २० गरजू मुलींना दत्तक घेऊन शिक्षणाची संधी शैक्षणिक साहित्य वाटप
- रक्तदान शिबिरे

**"शिक्षण म्हणजे केवळ करिअर नव्हे, तर व्यक्तिमत्व घडविण्याचा प्रवास" — याच विचाराची साक्ष म्हणजे नोबल इंटरनॅशनल स्कूल.**





- वृक्षारोपण आणि स्वच्छता
- अभियान
- पालकांसाठी वैद्यकीय मदत

या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये समाजसेवेची भावना रुजवली जाते. "हातात ज्ञान आणि मनात सेवा" हेच या शाळेचे खरे ब्रीद बनले आहे.

### शिक्षिका ते संचालिका : प्रेरणादायी प्रवास

डॉ. अर्चना सूर्यवंशी यांचा प्रवास अनेकांसाठी प्रेरणादायी आहे. लहानपणापासूनच त्यांना शिक्षणाची आवड होती. विवाहानंतरही शिक्षण थांबवायचे नाही, हा त्यांचा निर्धार होता.

पती प्रशांत सूर्यवंशी यांच्या पाठिंब्यामुळे त्यांनी बी.एस्सी., बी.कॉम., एमबीए आणि पीएच. डी. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर शिक्षिका म्हणून त्यांनी काम करताना विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी स्वतःला वाहून घेतले.

त्यांचा एकच उद्देश होता — ग्रामीण भागातील कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये.

आज त्या केवळ शाळेच्या संचालिका नाहीत, तर अनेक विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा देणाऱ्या मार्गदर्शक ठरल्या आहेत.

### भविष्यासाठी नवी वाटचाल

नोबल इंटरनॅशनल स्कूलचा प्रवास इथेच थांबणारा नाही. येणाऱ्या काळात अधिक आधुनिक सुविधा, आंतरराष्ट्रीय दर्जाचे अभ्यासक्रम आणि विद्यार्थ्यांसाठी नवे उपक्रम राबवण्याचे नियोजन आहे.

ग्रामीण भागातील शिक्षणाला नवी ओळख देत, विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर सक्षम बनवण्याचे स्वप्न या संस्थेने पाहिले आहे — आणि ते साकार करण्यासाठी ती सतत प्रयत्नशील आहे.

नोबल इंटरनॅशनल स्कूल ही केवळ एक शाळा नाही, तर एक चळवळ आहे — शिक्षणाची, संस्कारांची आणि सामाजिक जबाबदारीची. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी ही संस्था खऱ्या अर्थाने "आधुनिकतेचा दीपस्तंभ" ठरली आहे.

डॉ. अर्चना सूर्यवंशी यांच्या नेतृत्वाखाली ही शाळा भविष्यातही अनेक विद्यार्थ्यांचे आयुष्य उजळवत राहील, यात शंका नाही.








माना की अखबार की लाईफ एक दिन की होती हैं।
मगर उसका असर सालों तक रहता हैं।
वंचित, शोषित आणि पीडितांचा निर्भीड आवाज बनलेले

दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक : मुकुंदराव शामराव नंन्नवरे

दैनिक जन सम्राट टाईम्सच्या
नव प्रारंभ तसेच स्वागत अंकास
खूप खूप सदिच्छा!



- शुभेच्छुक -
हाजी सन्वर सत्तार शेख
गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर, पाळधी
ता. धरणगाव, जि. जळगाव

डिजिटल जगतातील सर्वात
वेगवान, गतिमान घडामोडींचा
वेध घेण्यास सज्ज झालेले

दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक : मुकुंदराव शामराव नंन्नवरे

दैनिक जन सम्राट टाईम्सच्या
नव प्रारंभ तसेच स्वागत अंकास
खूप खूप सदिच्छा!



- शुभेच्छुक -
श्री. दीपक पाठक
ग्रामसेवक
पाळधी खुर्द, पाळधी बुद्रुक,
व मुसळी ग्रामपंचायत,
ता. धरणगाव जि. जळगाव

डिजिटल जगतातील सर्वात वेगवान, गतिमान
घडामोडींचा वेध घेण्यास सज्ज झालेले

दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक : मुकुंदराव शामराव नंन्नवरे

नव प्रारंभ तसेच स्वागत अंकास
खूप खूप सदिच्छा!



श्री. शरदचंद्रजी कासट | श्री. अमोल कासट | श्री. शैलेश कासट | श्री. पिंटूशेठ जैन | श्री. संजूशेठ जैन | श्री. प्रशांत बिचवे

श्री. कृष्णाजी बिचवे | श्री. योगेश बिचवे | श्री. आशिष बिचवे | श्री. अक्षद बिचवे | श्री. गौरंग कासट | श्री. हर्षल बिचवे

शिवसेना



# गुलाबराव पाटील - पाळधीच्या मातीतून राज्याच्या मंचावर!

## एक माणूस, एक मुलूख, एक मैदान



जळगाव जिल्ह्याच्या धरणगाव तालुक्यातील लाडली हे एक छोटेसे गाव. तिथली माती, तिथली हवा आणि तिथल्या शेतकऱ्यांच्या घामाची भाषा - हीच भाषा घेऊन एक माणूस मोठा झाला. त्याचं नाव - गुलाबराव रघुनाथराव पाटील. आज - राज्याचे पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री आणि ज्या मातीत जन्मले, वाढले, आपल्या कर्तुत्वाने नावारूपाला आले, त्या जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री! गुलाबरावांचा जन्म ५ जून १९६६. मूळ गाव लाडली, पण वाढलेलं आणि घडलेलं गाव - पाळधी, ता. धरणगाव. या मातीनं त्यांना घडवलं, आणि त्यांनी या मातीचं नाव राज्याच्या नकाशावर कोरलं.

### शाखेपासून मंत्रालयापर्यंत - एक अचंबित करणारा प्रवास

कोणताही राजकीय वारसा नसताना, केवळ संघटन कौशल्य आणि वक्तृत्वशैलीच्या जोरावर त्यांनी जनमानसात स्वतःची ओळख निर्माण केली. हे वाक्य वाचायला सोपं, पण जगायला किती कठीण असेल - हे त्यांनाच ठाऊक. वयाच्या अवघ्या २५ व्या वर्षी त्यांनी पाळधी येथे शिवसेनेची शाखा उघडली आणि शाखाप्रमुख झाले. सुरुवातीला - एकट्याने शाखा सांभाळली, एकट्याने संघटन केल, एकट्याने लढाई लढले. पण या एकट्या माणसाच्या आवाजात इतकी ताकद होती, की जळगाव जिल्हा हलायला लागला.

१९९१ साली चाळीसगाव येथे बाळासाहेब ठाकरेंची सभा होती. चाळीसगावच्या त्या सभेत बाळासाहेबांचं भाषण ऐकताना एक अनामिक तरुण इतका भारावून गेला, की त्याने शिवसेनाच आपल्या श्वासाचा भाग करायचं ठरवलं. तो तरुण म्हणजे गुलाबराव पाटील. त्या सभेत तत्कालीन जिल्हाप्रमुख गणेश राणा यांनी गुलाबरावांना भाषणाची संधी दिली. ती संधी त्यांनी दोन्ही हातांनी पकडली - आणि पुढचं इतिहासाला माहीत आहे. साहेबांची ती सभा म्हणजे गुलाबरावांच्या आयुष्यातील टर्निंग पॉईंट.

### चार वेळा आमदार - जनतेचा कौल, अढळ विश्वास

गुलाबराव शिवसेनेच्या तिकिटावर एरंडोल मतदारसंघातून दहाव्या आणि अकराव्या विधानसभेवर निवडून गेले, त्यानंतर जळगाव ग्रामीण मतदारसंघातून तेरावी आणि चौदावी विधानसभाही जिंकली. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत गुलाबराव पाटील यांनी तब्बल १ लाख ४२ हजार ५९१ मतं मिळवत, प्रतिस्पर्ध्यावर ५९ हजार १३०च्या फरकाने विजय मिळवला. हा फरक म्हणजे केवळ मतांचा आकडा नाही - हा जनतेच्या विश्वासाचा जड दगड आहे, जो त्यांच्या पारड्यात पडतो वेळोवेळी.

### पाण्याचे मंत्री - पण काम मातीशी जोडलेलं

३० डिसेंबर २०१९ रोजी त्यांनी कॅबिनेट मंत्री म्हणून पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्रिपदाची शपथ घेतली. "पाण्याचे मंत्री" - हे पद ऐकायला साधं, पण उत्तर महाराष्ट्रातल्या दुष्काळी पट्ट्यात पाण्याचं महत्त्व काय असतं, वायफळ बडबड करण्यापेक्षा प्रत्यक्ष कामावर लक्ष केंद्रित करणं - हाच त्यांचा स्वभाव आहे, असं ते स्वतःच सांगतात.

### मुलूख मैदान तोफ - आवाजाला धार

गुलाबरावांची खरी ओळख आहे ती त्यांच्या बेधडक वक्तृत्वाची. सभेत ते उभे राहिले की, श्रोते स्तब्ध होतात. खुमासदार वक्तव्यांनी जनतेवर प्रभाव पाडणारे नेते म्हणून ते ओळखले जातात. मुंबईत खान्देशी माणसे संख्येने भरपूर असलेल्या कल्याण पट्ट्यात, इतकेच नव्हे तर पनवेल, भाईंदर परिसरातही प्रचार सभात प्रमुख वक्ते म्हणून त्यांना नेहमी मागणी असते.

एका सभेत त्यांनी जाहीरपणे सांगितलं - "माझ्या कार्यकर्त्यांकडे वाकड्या नजरेने बघितलं, तर पालकमंतत्री काय असतो, ते दाखवून देणार." हे वाक्य ऐकून विरोधकही विचारात पडले आणि कार्यकर्ते जल्लोशात. आक्रमक नेते म्हणून गुलाबराव राज्यात ओळखले जातात - मग समोर कोणीही असो. मित्रपक्ष असो, विरोधक असो, किंवा स्वपक्षातील दुखावलेलं मन असो - गुलाबराव बोलतात ते थेट, बोलतात ते स्पष्ट.




### पाळधी-धरणगाव मनाचं घर, राजकारणाचं मंदिर

राज्याच्या मंत्रालयात बसणारा हा माणूस मनाने कधीच पाळधी सोडत नाही. त्यांचं जन्म गाव व राहण्याचं गाव पाळधी, ता. धरणगाव आहे, आणि प्राथमिक-माध्यमिक शिक्षणही याच परिसरात झालेलं आहे. या मातीच्या ऋणाची जाणीव त्यांच्या प्रत्येक भाषणात, प्रत्येक निर्णयात दिसते. धरणगाव-पाळधी परिसरातला शेतकरी, तरुण, महिला - यांच्यासाठी त्यांचे दरवाजे सदैव उघडे असतात. गेल्या २०-२५ वर्षांपासून जळगाव जिल्ह्यात ५ जून - गुलाबरावांचा वाढदिवस - हा एक उत्सवच बनला आहे.

### शेवटी एवढंच,

पाळधीच्या मातीत रुजलेलं एक बीज, धरणगावच्या पाण्याने पोसलेलं, जळगाव ग्रामीणच्या शेतकऱ्यांनी वाढवलेलं - आज राज्याच्या राजकारणात एक मुलूख मैदान तोफ म्हणून धडाडत उभं आहे.

गुलाबराव पाटील - हे फक्त एक नाव नाही. हा एक ब्रँड आहे, हा एक जिवंत इतिहास आहे. उत्तर महाराष्ट्राचा, खान्देशाचा, आणि त्या मातीत घाम गाळणाऱ्या प्रत्येक सामान्य माणसाचा आवाज आहे.

### गुलाबराव आणि बाळासाहेब: गुरू आणि शिष्य

गुलाबराव पाटील नेहमीच अत्यंत अभिमानाने आणि स्पष्टपणे सांगतात - "बाळासाहेब ठाकरे हेच माझे दैवत आहेत. भगवा झेंडा आणि धनुष्यबाण मी कधीही सोडले नाहीत." हे केवळ बोलण्यापुरतं नाही - हे त्यांच्या रोमारोमात भिनलेलं आहे.

### टपरीवाल्याला मंत्री बनवणारे जादूगार

एका सभेत गुलाबराव भावनावेगाने सांगत होते - बाळासाहेबांनी सामान्य माणसांना कसं मोठं केलं. राणे काय करायचे, भुजबळ काय करायचे - अगदी छोट्या-छोट्या लोकांना साहेबांनी नेते बनवलं. बाळासाहेबांची शिकवण सांगताना गुलाबराव म्हणतात - "खरा श्रीमंत तो, ज्याच्याकडे लोकांचा सर्वाधिक आधार असतो." हे वाक्य साहेबांचंच, पण गुलाबरावांनी ते जगूनही दाखवलं.

महिला दिनाची ती आठवण - एक हृदयस्पर्शी किस्सा जळगाव महापालिकेच्या महिला दिन कार्यक्रमात गुलाबराव भावुक झाले आणि त्यांनी बाळासाहेबांनी महिलांना आत्मसंरक्षणासाठी दिलेल्या सल्ल्याची आठवण सांगितली. बाळासाहेबांचा एक एक किस्सा सांगताना त्यांच्या डोळ्यांत पाणी येतं, हे त्यांचं बाळासाहेबांवरचं निस्सीम प्रेम आहे.

### गुलाबराव आणि शिंदे साहेब - निष्ठेचं अनोखं नातं

"मी शेवटचा उभा राहिलो - पण आलो त्यांच्याच बाजूने" जून २०२२ चा तो धक्कादायक काळ. जळगाव जिल्ह्यातील इतर सर्व शिवसेना आमदार शिंदेंसोबत गेले होते. पण गुलाबराव पाटील एकटे मुंबईत थांबले होते - बुधवारी सकाळी १० वाजेपर्यंत. ते उद्धव ठाकरेंकडे उत्तराची वाट पाहत होते. पण कोणताही निर्णय न झाल्याने, दुपारी बारा वाजता ते सूरतच्या दिशेने निघाले.

### गुवाहाटीत शिंदेंनी केलं जंगी स्वागत

गुवाहाटीच्या हॉटेलमध्ये एकनाथ शिंदे स्वतः दरवाजात उभे राहून गुलाबरावांच्या स्वागतासाठी थांबले होते. गुलाबराव पाटील आले आणि त्यांनी शिंदेंना नमस्कार करत आशीर्वाद घेतले - त्या क्षणी दोन्ही नेत्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळंच समाधान होतं.

### "होय, मी उठाव केला— पण का?"

हा गुलाबरावांचा सर्वात धाडसी आणि चर्चेचा किस्सा. एका कार्यक्रमात गुलाबराव थेट म्हणाले - "होय, मी मी उठाव केला. एकनाथ शिंदे यांच्यासारखा मराठा चेहरा मुख्यमंत्री व्हावा यासाठी मी हा उठाव केला. आज हा गुलाबराव मुख्यमंत्र्यांच्या बाजूला बसतो - त्यातच मतदारसंघाचा जयजयकार आहे." शिंदेंप्रतीची ही निष्ठा शब्दात मांडण्याची त्यांची शैलीच वेगळी!

### "आम्हाला उद्धवसाहेबांची भेट मिळत नव्हती, शिंदे साहेब विचारायचे..."

विधानसभेत विश्वासमताच्या वेळी गुलाबराव कळवळून म्हणाले - "आधीच्या सरकारमध्ये आम्हाला उद्धव ठाकरेंची भेट मिळत नव्हती, फोनही घेतले जात नव्हते. त्याच वेळी एकनाथ शिंदे विचारायचे, कोरोना काळात किट वाटप करायचं का, काय मदत हवी?" हाच फरक त्यांना शिंदेंकडे घेऊन गेला.

गुलाबराव आजही ठामपणे सांगतात - "आम्ही बंड केलेलं नाही, आम्ही उठाव केला आहे. बाळासाहेबांच्या हिंदुत्वाच्या विचारापासून फारकत घेणाऱ्यांविरुद्ध आम्ही उभे राहिलो - आम्ही आजही शिवसेनेतच आहोत." थोडक्यात सांगायचं तर, बाळासाहेब गुलाबरावांचे दैवत आहेत, तर एकनाथ शिंदे त्यांच्यासाठी बाळासाहेबांच्या विचारांचा जिवंत वारस. एका ध्येयाने बांधलेलं हे नातं - राजकारणापलीकडचं आहे.

# क्रांतीची भूमी, श्रद्धेचे केंद्र : टिटवाळा ते कसारा - एक महाप्रदेश



मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसपासून कसाऱ्यापर्यंत धावणारी सेंट्रल रेल्वेची लोकल - ही केवळ एक रेल्वे गाडी नाही. ती एक चालती-बोलती इतिहासाची गाथा आहे. प्रत्येक स्थानक एक स्वतंत्र विश्व आहे, प्रत्येक परिसर एक स्वतंत्र अध्याय आहे. डोंबिवली - कल्याण  नंतर नाशिक मार्गावर शहाड - टिटवाळा - वाशिंद - आसनगाव (शहापूर) - खर्डी - आटगाव - कसारा. तर, पुणे मार्गावर उल्हासनगर - अंबरनाथ - बदलापूर - नेरळ आणि कर्जत! त्याला जोडूनच - भिवंडी - मुरबाड - तळोजा - पनवेल — हा संपूर्ण पट म्हणजे महाराष्ट्राच्या सामाजिक, औद्योगिक, क्रांतिकारी आणि आध्यात्मिक इतिहासाचा एक अफाट कोलाज. या प्रदेशात पौराणिक कथा आहेत आणि ब्रिटिशांविरुद्धचा उठाव आहे. अकराव्या शतकातील मंदिरे आहेत आणि विसाव्या शतकातील कारखाने आहेत. फाळणीच्या जखमा आहेत आणि आंबेडकरी चळवळीची प्रेरणा आहे. सह्याद्रीचे घनदाट जंगल आहे आणि आधुनिक एमआयडीसी चे धुराडे आहेत. याच भूमीतून जन 'सम्राट टाईम्स' हे पुरोगामी, समतावादी आणि आंबेडकरी विचारांचे दैनिक उदयाला येत आहे. हे नुसते वृत्तपत्र सुरू होत नाही,  एका नव्या युगाची नांदी होत आहे.

### टिटवाळा : जिथे महाभारत जिवंत आहे!

टिटवाळा हे या संपूर्ण लेखाचे आणि जन 'सम्राट टाईम्स'चे मुंबईतील केंद्र आहे. कारण ते भौगोलिक केंद्र आहे म्हणून नव्हे; कारण ते वैचारिक केंद्र बनण्याची क्षमता बाळगते म्हणून. ऋषी कण्वांचा आश्रम असलेली ही भूमी शकुंतलेचे जन्मस्थान मानली जाते. शकुंतला - जिचे प्रेम, विरह आणि पुनर्मिलन महाभारताच्या सर्वात हृदयस्पर्शी कथांपैकी एक आहे. दंतकथेनुसार, शकुंतलेने येथे सिद्धिविनायकाची प्रार्थना केली आणि दुष्यंताशी पुनर्मिलन झाले, आणि त्यांचा पुत्र भरत, ज्याच्या नावावरून आपल्या देशाला 'भारत' हे नाव मिळाले, तो याच भूमीत जन्मला. आज अंगारकी संकष्टीला लाखो भाविक या सिद्धिविनायकाचे दर्शन घेण्यासाठी येतात -विभक्त दाम्पत्यांना एकत्र आणणारा, मनोकामना पूर्ण करणारा हा गणपती टिटवाळ्याची सर्वात मोठी ओळख आहे. पण, टिटवाळा केवळ धार्मिक पर्यटनाचे केंद्र नाही. या परिसरात कातकरी जमातीचे लोक शतकांपासून राहत आले आहेत - काळू नदीपलीकडे होड्यांनीच पोहोचता येणाऱ्या भागात त्यांच्या वस्त्या आहेत. आदिवासी जगण्याचा संघर्ष आणि महामानवांच्या पाऊलखुणा - दोन्ही इथे एकत्र आहेत.

### डोंबिवली : आशियातील पहिले शंभर टक्के साक्षर शहर

टिटवाळ्याचा जवळचा शेजारीच, डोंबिवली - हे एक असे शहर आहे, जे भारताच्या नकाशावर एक अनोखी नोंद करते. डोंबिवली हे महाराष्ट्रातील पहिले आणि भारतातील दुसरे शंभर टक्के साक्षर शहर. केवळ आकडेवारी नाही, ही एका मध्यमवर्गीय मराठी शहराची सांस्कृतिक ओळख आहे. पाचशेहून अधिक सामाजिक आणि सांस्कृतिक संस्था या शहरातील सामाजिक-सांस्कृतिक जडणघडणीत योगदान देतात. डोंबिवली हे नाव त्या परिसरात राहणाऱ्या 'डोंब' जमातीवरून पडले, हे लोक हिंदूंच्या अंत्यसंस्कारात मदत करत असत. शेजारचे 'ठाकुरली' गाव तिथे राहणाऱ्या ठाकर आदिवासींवरून ओळखले जाते. आजच्या आधुनिक डोंबिवलीच्या नावातच त्याच्या बहुजन आदिवासी मुळांचा इतिहास दडलेला आहे. १९६४ साली एमआयडीसीने स्थापन केलेल्या डोंबिवली औद्योगिक क्षेत्रात घर्डा केमिकल्स, विको लॅबोरेटरीज यांसारखे ८१०हून अधिक उद्योग कार्यरत आहेत. देशाला रंग, रसायने, औषधे आणि इंजिनिअरिंग उत्पादने देणारे हे शहर महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाचा एक आधारस्तंभ आहे. या शहरात खान्देशातील लेवा पाटीदारांची संख्या मोठी आहे.इथे उद्योगांसोबत आलेल्या प्रदूषणाचाही प्रश्न गंभीर आहे. डोंबिवली MIDC मधील काही कारखान्यांतील स्फोट आणि रासायनिक प्रदूषणाबद्दल रहिवाशांनी वारंवार तक्रारी नोंदवल्या आहेत. इथल्या कामगारांचे प्रश्न, पर्यावरण संरक्षण आणि उद्योगांची सामाजिक जबाबदारी - हे जन 'सम्राट टाईम्स'च्या पत्रकारितेसाठी महत्त्वाचे क्षेत्र आहे.

### कल्याण : इतिहासाचे महाद्वार

कल्याण — हे नाव मराठी माणसाला सांगायला नको. सातशे वर्षांहून अधिक इतिहास असलेले हे शहर उल्हास नदीच्या काठावर वसले आहे. मध्ययुगात अरब व्यापाऱ्यांचे बंदर, पेशवेकालीन महत्त्वाचे केंद्र, ब्रिटिशकाळात रेल्वे जंक्शन - कल्याणने प्रत्येक युगात आपली ओळख ठेवली. आजही कल्याण-डोंबिवली परिसरात पेशवेकाळात घोड्यांच्या प्रशिक्षणासाठी वापरलेले मैदान आणि पेशव्यांनी वापरलेल्या तलावाच्या खुणा भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणाने जतन केल्या आहेत. स्वातंत्र्यलढ्याच्या काळात कल्याण परिसराने अनेक देशभक्त दिले. महात्मा गांधींच्या असहकार चळवळीला इथून मोठा प्रतिसाद मिळाला. कामगार चळवळ, जमीन सुधारणा, आंबेडकरी जागृती - या सर्व प्रवाहांचे कल्याण एक प्रमुख केंद्र राहिले. शहाड म्हणजे कल्याणचा शेजारी. बिर्ला मंदिराचे हे ठिकाण. पण त्याहीपेक्षा, एका शांत आणि शिस्तशीर नागरी वसाहतीचे प्रतीक. याच कसारा मार्गावर, वाशिंद हे एके काळी भात शेती आणि मिठागरांसाठी ओळखले जाणारे गाव. आज झपाट्याने बदलणाऱ्या या परिसरात आगरी-कोळी समाजाचे पारंपरिक जगणे आणि नव्या विकासाचा रेटा यांच्यातील संघर्ष सुरू आहे.

अंबरनाथ : दगडात कोरलेला इतिहास! 11

आता आपल्या अमळनेर शहरात
1 मार्च 2026 पासून
प्रवेश सुरु 2026-27 साठी
प्ले ग्रुप ते इ. 4 थी पर्यंत

Noble PODAR LEARN SCHOOL
Quality Education, Wherever We Go




अमळनेरमधील पोदार स्कूलची भव्य दिव्य इमारत...

Highlights of our school
- Consistently ranked as one of the best educational groups in India.
- Extensive use of technology in teaching.
- Trained, qualified and committed teaching team.
- Multi-route bus facility.
- Limited seats available on a first come,first serve basis.



Limited Seats Available On a First Come, First Serve basis.

Reputation: Recognized as the "Most Respected Education Brand" in India (2024-25).
Infrastructure & Curriculum: Offers CBSE, ICSE, and IGCSE curriculums, featuring air- conditioned classrooms, technology-driven
learning (robotics/coding), and specialized, safe, and modern learning environments.
. Core Values: Focuses on honesty, integrity, service, and holistic development.
. Reach: Primarily located across India, with a strong presence in Maharashtra.

पोदार कॅम्पस, प्रसन्न रेसिडेन्सीच्या जवळ, गलवाडे रोड, अमळनेर, जि. जळगाव - 425401
9175675651 / 8668416383 / 8668412723
podareducation.org PodarSmarterSchools podarsmarterschools

99 वर्ष जूना शिक्षण क्षेत्रातला ब्रँड आता आपल्यासोबत.
• 2,50,000 पेक्षा जास्त विद्यार्थी असलेला ब्रँड.
भारतभर 150 पोदार स्कूल्स
123 पेक्षा जास्त पोदार पार्टनर स्कूल्स्

शिक्षण क्षेत्रातला 15 वर्षांपेक्षा जास्त अनुभव असलेल्या मॅनेजमेंट सोबत आता आपली पोदार अमळनेर शहरात
Using the latest tools and methods of teaching, Podar Education Network
Educates 2,50,000 students annually through 273 schools across India.



डॉ.सौ. अर्चना प्रशांत सूर्यवंशी
अध्यक्षा-सूर्या फाउंडेशन
चेअरमन-नोबल इंटरनेशनल स्कूल, पाळधी
चेअरमन-नोबल पोदार स्कूल, अमळनेर

कार्यालयीन वेळ :
• सोमावर ते शनिवार सकाळी 9 ते 4 ·रविवारी 10 ते 2

# अंबरनाथ : दगडात कोरलेला एक हजार वर्षांचा इतिहास!

वालधुनी नदीच्या पश्चिम काठावर वसलेले अकराव्या शतकातील हे शिवमंदिर महाराष्ट्रातील सर्वात जुने निश्चित दिनांकित भूमिज शैलीचे मंदिर आहे. या मंदिराचे गाभारे जमिनीखाली असून वीस पायऱ्या उतरून आत जावे लागते. मंदिराचे शिखर अर्धवट असून वर आकाश उघडे आहे - जणू 'अंबर' म्हणजेच आकाश हेच या मंदिराचे शिखर आहे. युनेस्कोने जागतिक सांस्कृतिक वारशाच्या यादीत या मंदिराचा समावेश केला आहे. मात्र, आजही हे मंदिर पुरेशा जाहिरातीविना, उपेक्षित आहे. अकराव्या शतकातील हे स्थापत्यशास्त्राचे अद्भुत नमुना आणि त्याच्या शेजारी एमआयडीसीचे कारखाने - हा विरोधाभास अंबरनाथची कहाणी सांगतो.

**बदलापूर : शांत वसाहती, मोठे प्रश्न**

बदलापूर हे आजकाल मुंबईकरांचे 'सेकंड होम' बनले आहे. पण या शांत वाटणाऱ्या परिसराच्या पोटात मोठे प्रश्न आहेत. उल्हास नदीचे प्रदूषण, बेकायदेशीर बांधकामे, शेतजमिनींचे रूपांतर — हे प्रश्न जन 'सम्राट टाईम्स'च्या तपासी पत्रकारितेसाठी एक महत्त्वाचे क्षेत्र आहे.

**उल्हासनगर : राखेतून उभी राहिलेली 'उद्यमनगरी'**

१५ ऑगस्ट १९४७ रोजी फाळणी झाली आणि सिंध प्रांत पाकिस्तानात गेला. अंदाजे दहा लाख हिंदू सिंधींना आपले घर, संसार सोडावे लागले. या निर्वासितांपैकी मोठ्या संख्येने लोक कल्याण परिसरातील लष्करी बराकींमध्ये आले. हे लोक प्रामुख्याने सिंधमधील लहान व्यापारी-व्यवसायी पार्श्वभूमीचे होते. सर्वस्व गमावलेल्या या माणसांनी काय केले? — रडत बसले नाहीत. कामाला लागले आणि मग जन्म झाला जगातील सर्वात गमतीशीर 'Made in USA' लेबलचा — इथे USA म्हणजे ' उल्हासनगर सिंधी असोसिएशन'! शून्यातून विश्व निर्माण करण्याच्या या अदम्य जिद्दीचे उल्हासनगर हे जिवंत स्मारक आहे. आज या २८ चौरस किलोमीटर परिसरात सुमारे ३ लाख ८९ हजार सिंधी वंशाचे लोक राहतात - भारतातील सिंधींची सर्वात मोठी वसाहत. फाळणीची जखम आणि उद्यमशीलतेची भरारी - उल्हासनगर दोन्ही एकत्र सांगते.

**भिवंडी-मुरबाड: विणकर, आदिवासी आणि नव्या युगाचा उंबरठा**

भिवंडी हे एके काळी देशातील सर्वात मोठ्या पॉवरलूम केंद्रांपैकी एक. इथल्या विणकर कामगारांनी पिढ्यानपिढ्या या उद्योगात घाम ओतला. इंटक आणि डाव्या कामगार चळवळींचे हे एक महत्त्वाचे केंद्र राहिले. आज भिवंडी बदलले आहे. मुंबईच्या ई-कॉमर्स वेअरहाऊसिंगचे सर्वात मोठे केंद्र म्हणून त्याची ओळख तयार होत आहे. अमेझॉन, फ्लिपकार्ट यांसारख्या कंपन्यांची मोठी गोदामे इथे आहेत. पण या बदलात इथल्या मूळ विणकर कामगार समाजाचे काय झाले? - हा प्रश्न विचारणारी पत्रकारिता आज गरजेची आहे.

मुरबाड — सह्याद्रीच्या कुशीत वसलेला तालुका. कातकरी, ठाकर, वारली आदिवासींची ही भूमी. सह्याद्रीच्या पर्वतरांगांमध्ये राहणाऱ्या कोळी जमातींनी ब्रिटिशांनी त्यांचे पारंपरिक हक्क हिरावून घेतले तेव्हा सशस्त्र उठाव केला होता. या आदिवासींच्या भूमी अधिकारांचा, वनाधिकारांचा लढा आजही सुरू आहे.

**तळोजा : कोट्यवधींचे उत्पादन, लाखांचा रोजगार**

मुंबईच्या उपनगरांकडून नवी मुंबईच्या दिशेने जाताना लागतो तळोजा — हा एक शांत वाटणारा परिसर, पण त्याच्या पोटात एक प्रचंड औद्योगिक सामर्थ्य दडले आहे. तळोजा एमआयडीसी चे एकूण क्षेत्र ९०० हेक्टर असून त्यात सुमारे ९५० उद्योग कार्यरत आहेत. या औद्योगिक क्षेत्राची वार्षिक उलाढाल ७५ हजार कोटी रुपयांहून अधिक आहे आणि ९ हजार कोटी रुपयांची निर्यात होते. प्रत्यक्ष एक लाख कामगार आणि अप्रत्यक्षपणे ४९ हजार व्यक्तींना या उद्योगांमुळे रोजगार मिळतो. सीफूड निर्यातीमध्ये तळोजा हे भारतातील एक महत्त्वाचे केंद्र आहे. मात्र, या कोट्यवधींच्या उद्योगात काम करणाऱ्या कामगारांचे प्रश्न, त्यांचे वेतन, राहण्याची सोय, आरोग्य - हे प्रश्न कोण मांडणार? जन 'सम्राट टाईम्स' हे उत्तर आहे.

**पनवेल : रायगडचे दार आणि भविष्याचे शहर**

पनवेलला 'रायगडचे प्रवेशद्वार' म्हणतात - कारण मुंबईकडून येताना रायगड जिल्ह्यात प्रवेश करताना



पनवेल हे पहिले शहर आहे. पनवेल परिसरात लार्सन अँड टुब्रो, रिलायन्स, हिंदुस्थान ऑर्गेनिक केमिकल्स, इस्त्रो चे प्रोपेलंट कॉम्प्लेक्स, ओएनजीसी यांसारख्या देशातील आघाडीच्या कंपन्यांचे कारखाने आणि प्रकल्प आहेत. इथलं जेएनपीटी बंदर या परिसराला जागतिक व्यापाराशी जोडते. पनवेलजवळील कर्नाळा किल्ला हा एक महत्त्वाचा ऐतिहासिक किल्ला आहे, जो बोर खिंडीवर लक्ष ठेवत होता, ही खिंड कोकण किनारपट्टी आणि महाराष्ट्राचे अंतर्भाग यांना जोडणारा मुख्य व्यापारी मार्ग होती. २०२५ साली उद्घाटन झालेले नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ — पनवेल परिसरासाठी एक नवा युग घेऊन आले आहे. या विकासाचे फायदे इथल्या मूळ आगरी-कोळी समाजापर्यंत पोहोचतात का? - हा प्रश्न विचारणे हेच खरे पत्रकारिताचे काम.

**आसनगाव-शहापूर : सह्याद्रीच्या दरवाज्यातील संक्रमण**

सेंट्रल रेल्वेवर आसनगावनंतर सुरू होते सह्याद्रीचे राज्य. आसनगाव हे एक महत्त्वाचे जंक्शन — इथून शहापूर, मुरबाड, भंडारदरा या परिसरात जाणारे मार्ग फुटतात. आसनगाव हे सह्याद्रीतील साहसी ट्रेकर्ससाठी एक महत्त्वाचे बेस स्थानक बनले आहे — संधान व्हॅली, अजोबागड, गोरखगड यांसारख्या अनेक ट्रेकिंग स्थळांसाठी प्रवेशद्वार म्हणून ते ओळखले जाते.

शहापूर — सह्याद्रीच्या कुशीत वसलेला हा तालुका आदिवासी जीवनाचे केंद्र आहे. भातशेती, नागली, वरई हे इथले पारंपरिक पिके. भातसा धरण, चोंढा जलविद्युत प्रकल्प - यांनी या परिसराला पाणी आणि वीज दिली, पण त्याच धरणांनी अनेक आदिवासी गावे बुडवलीही. हे विस्थापित आदिवासी आजही न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत. सह्याद्रीच्या पर्वतरांगांमध्ये राहणाऱ्या कोळी आणि आदिवासी जमातींनी ब्रिटिश राजवटीत जेव्हा त्यांचे पारंपरिक अधिकार हिरावले गेले, तेव्हा उठाव केला. त्या उठावांची परंपरा आजही या मातीत जिवंत आहे — जमीन अधिकार, वनाधिकार आणि विकास प्रकल्पांतील न्यायासाठी.

**कसारा : सेंट्रल रेल्वेचे शेवटचे टोक, सह्याद्रीचे प्रवेशद्वार**

कसारा — हे नाव ऐकले की, डोळ्यासमोर येतो तो घाट. कसारा घाट उतरला की, महाराष्ट्राचे दोन भाग वेगळे होतात — कोकण आणि देश. हे भौगोलिक वास्तव आहे, पण त्याचे सांस्कृतिक महत्त्वही तितकेच मोठे आहे. कसारा परिसर म्हणजे घनदाट जंगले, धबधबे, आदिवासी पाडे आणि ट्रेकर्सचे स्वर्ग. कळसूबाई - महाराष्ट्राचे सर्वोच्च शिखर - इथूनच जाता येते. भंडारदरा, संधान व्हॅली यांसाठी कसारा हे एक महत्त्वाचे बेस स्थानक आहे. या परिसरातील आदिवासी समाज - ठाकर, कातकरी, वारली - यांचे जगणे आजही कठीण आहे. शिक्षण, आरोग्य, रोजगार, जमीन - हे प्रश्न सोडवणे हे एकविसाव्या शतकातील खरे आव्हान आहे.या संपूर्ण प्रदेशाचा आत्मा : पाच प्रवाह, एक ओळख

हा संपूर्ण प्रदेश पाच प्रमुख प्रवाहांनी घडला आहे — पहिला प्रवाह - आदिवासी भूमिपुत्र : कातकरी, ठाकर, वारली, आगरी, कोळी - हे या भूमीचे खरे वारस. त्यांचे हक्क, त्यांची संस्कृती, त्यांचे अस्तित्व - हे सांगणे हेच खरे पत्रकारिताचे कर्तव्य.दुसरा प्रवाह - कामगार चळवळ : डोंबिवली - अंबरनाथ - भिवंडी - तळोजा - पनवेलच्या कारखान्यांतील लाखो कामगार - यांच्या न्याय्य वेतनासाठी, सुरक्षिततेसाठी, हक्कांसाठी आवाज उठवणे. _तिसरा प्रवाह - आंबेडकरी विचार :& कल्याण ते कसारा या संपूर्ण पट्ट्यात दलित-बहुजन समाज मोठ्या संख्येने आहे.







# बाबासाहेबांना घडविणारे गुरु, ग्रंथसंपदा आणि साहित्य!



शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या नेत्या किशोरी पेडणेकर यांनी केलेला दावा - की, "मनाचे श्लोकांनी बाबासाहेबांच्या बालपणावर संस्कार पडले आणि त्यामुळे ते चांगले संविधानकार बनले" - हा ऐतिहासिकदृष्ट्या निराधार आणि बाबासाहेबांच्या जीवनचरित्राशी मुळातच विसंगत आहे. याची कारणे अनेक आहेत.

**पहिले कारण:** मनाचे श्लोक हे समर्थ रामदास स्वामींनी रचले, जे हिंदुत्वाशी संबंधित विचारधारेशी निगडित आहेत आणि ज्यांचा प्रभाव आरएसएसचे संस्थापक हेडगेवार यांच्यावर मोठ्या प्रमाणात होता. रामदास स्वामींनी प्रतिपादन केलेली वर्णव्यवस्था आणि ब्राह्मणी सामाजिक रचना - हीच आयुष्यभर बाबासाहेबांनी आव्हान दिलेली व्यवस्था आहे.

**दुसरे कारण:** बाबासाहेब आंबेडकर हे महार (दलित) जातीत जन्मले होते आणि अस्पृश्यतेच्या कारणाने त्यांना प्रचंड सामाजिक-आर्थिक भेदभावाला सामोरे जावे लागले. शाळेत ते वर्गाच्या आत बसू शकत नव्हते. अशा परिस्थितीत, जातिव्यवस्थेला धार्मिक वैधता देणाऱ्या साहित्यात बाबासाहेब रस घेतील, हे सर्वथा अशक्य आहे.

**तिसरे कारण:** बाबासाहेबांनी स्वतः 'माझी आत्मकथा' या ग्रंथात आपल्या तीन गुरूंचा उल्लेख केला आहे - गौतम बुद्ध, संत कबीर आणि महात्मा जोतिबा फुले. या तिघांत रामदास स्वामी किंवा मनाचे श्लोक यांचा कुठेही उल्लेख नाही.

**चौथे कारण:** बाबासाहेबांनी डिसेंबर १९२७ मध्ये महाड येथे मनुस्मृती जाहीरपणे जाळली. जी व्यवस्था मनुस्मृतीला पवित्र मानते, तीच व्यवस्था रामदासी परंपरेलाही पोषक आहे. त्यामुळे पेडणेकरांचा दावा इतिहासाशी पूर्णतः विसंगत आहे.

हा दावा करणे म्हणजे बाबासाहेबांनी आयुष्यभर ज्या विचारधारेशी झुंज दिली, त्याच विचारधारेचे श्रेय त्यांच्या महान कर्तृत्वाला जोडण्याचा प्रयत्न आहे - हे वैचारिकदृष्ट्या अन्यायकारक आहे.

**बाबासाहेबांना खरोखर घडविणारे गुरू**

1. वडील रामजी सकपाळ - पहिला प्रकाश

बाबासाहेबांचे वडील रामजी मालोजी सकपाळ हे ब्रिटिश भारतीय सेनेत सुभेदाराच्या हुद्द्यावर होते. सेवानिवृत्तीनंतर त्यांनी मुलांना शिक्षण देण्यावर जोर दिला. शाळेत जाण्यापूर्वीच रामजींनी भिवाचे काही शिक्षण घरीच केले होते. त्यांनी मुलांना रामायण, महाभारत वाचण्यास दिले, परंतु भिवाने ते वाचल्यावर त्यांना त्यातील अन्याय्य गोष्टींवर आक्षेप घेतला - हे बाबासाहेबांचे चिकित्सक मन बालपणातच जागृत होते याचे द्योतक आहे.

**2. कृष्णाजी केशव आंबेडकर - आडनावाचे गुरू**

सातारा येथील शाळेत कृष्णाजी केशव आंबेडकर हे बाबासाहेबांचे प्रारंभीचे शिक्षक होते. ते मराठी, संस्कृत, हिंदी आणि इंग्रजी भाषांचे ज्ञाते होते. ते भिवाला आपल्या शिदोरीतून जेवू घालत असत. त्यांनी भिवाचे 'आंबडवेकर' हे कठिण आडनाव बदलून स्वतःचे 'आंबेडकर' हे नाव त्याला दिले. हे गुरुजी भिवाच्या ओंजळीत मोठ्या प्रेमाने भाजी-भाकरी घालत असत. हे प्रेम बाबासाहेबांच्या लक्षात राहिले आणि गोलमेज परिषदेला जाताना त्यांनी आपल्या गुरूला पत्रही पाठवले.

**3. कृष्णाजी अर्जुन केळुसकर - जीवन बदलणारे गुरू**

कृष्णाजी अर्जुन केळुसकर (२० ऑगस्ट १८६० – १४ ऑक्टोबर १९३४) हे मराठी लेखक होते. त्यांनी गौतम बुद्ध, शिवाजी महाराज आणि संत तुकाराम यांची मराठीतील पहिली चरित्रे लिहिली. केळुसकरांनी स्वतः लिहिलेले बुद्धचरित्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाल्याच्या सत्कार समारंभात भेट म्हणून दिले. केळुसकर गुरुजींनी मुंबईत बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांची भीमरावांशी भेट घालून दिली. त्यानंतर केळुसकर व निर्णयसागर छापखान्याचे मालक दामोदर सावळाराम यंदे यांच्या प्रयत्नांमुळे महाराजांनी त्यांना जानेवारी १९०८ पासून दरमहा रुपये २५ची शिष्यवृत्ती देऊ केली.



करंट इश्यू

विक्रांत पाटील
ज्येष्ठ पत्रकार,
राजकीय विश्लेषक, मुंबई.
vikrant@journalist.com

**4. सयाजीराव गायकवाड तृतीय - स्वप्नांना पंख देणारे**

१९१३ मध्ये, वयाच्या २२व्या वर्षी आंबेडकरांना सयाजीराव गायकवाड यांनी स्थापित केलेल्या योजनेंतर्गत न्यूयॉर्क येथील कोलंबिया विद्यापीठात स्नातकोत्तर शिक्षणासाठी तीन वर्षांकरिता दरमहा ११.५० पौंड (स्टर्लिंग) शिष्यवृत्ती देण्यात आली. या एका निर्णयाने भारताचे भवितव्य बदलले.

**5. जॉन ड्युई - लोकशाहीचे तत्त्वज्ञान**

कोलंबिया विद्यापीठात आंबेडकरांना जॉन ड्युई यांचे मार्गदर्शन मिळाले. आंबेडकरांच्या समता आणि सामाजिक न्यायाच्या कल्पनांनी डेव्ही सुद्धा प्रभावित झाले होते. आंबेडकरांनी या विद्यापीठात प्रथमच स्वातंत्र्य, समता आणि बंधुता तत्त्वांचा अनुभव घेतला होता. प्राध्यापक एडविन सेलिग्मन यांनी आंबेडकरांबद्दल म्हटले, "भीमराव आंबेडकर हे केवळ भारतीय विद्यार्थ्यांमध्येच नव्हे तर अमेरिकन विद्यार्थ्यांमध्येही सर्वात बुद्धिमान विद्यार्थी आहेत."

**6. महात्मा जोतिबा फुले - वैचारिक आधारस्तंभ**

महात्मा जोतिबा फुले यांनी सामाजिक लोकशाही निर्माण करण्यासाठी हिंदू समाजाला चैतन्य द्यायचे होते. त्याप्रमाणेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचाही असाच दृष्टिकोण होता आणि हिंदू समाजातील विसंगती दूर करण्यासाठी आंबेडकरांनी आयुष्यभर काम केले.

**बाबासाहेबांवर प्रभाव टाकणारी ग्रंथसंपदा**

**1. केळुसकरांचे बुद्धचरित्र - आयुष्याचा दीपस्तंभ**

बाबासाहेबांनी स्वतः सांगितले आहे की, "माझे पहिले सर्वश्रेष्ठ गुरु गौतम बुद्ध आहेत. शिवचरित्रकार दादा केळुसकर यांनी मला एक पुस्तक भेट म्हणून दिले होते. या पुस्तकात बुद्धाचे चरित्र लिहिले होते. पुस्तक वाचल्यानंतर मी बौद्ध धर्माचा उपासक बनलो." केळुसकरांचे १८९८ मध्ये प्रकाशित झालेले कोणत्याही भारतीय भाषेतील पहिले 'बुद्धचरित्र' वाचून धर्मानंद कोसंबी, डॉ. आनंदराव नायर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सर्वजण बुद्धाशी जोडले गेले.

**2. जॉन ड्युईची तत्त्वे - लोकशाहीचा पाया**

कोलंबियामध्ये बाबासाहेबांनी ड्युईच्या 'डेमोक्रेसी अँड एज्युकेशन', 'एक्सपीरीयन्स अँड नेचर' यासारख्या ग्रंथांचा गाढा अभ्यास केला. लोकशाही हे केवळ राजकीय रूप नसून जीवनपद्धती आहे - हे तत्त्व बाबासाहेबांनी संविधानात अंतर्भूत केले.

**3. स्वतःची ग्रंथसंपदा - लेखणीने केलेला संग्राम**

बाबासाहेबांनी स्वतः असंख्य ग्रंथ लिहिले: त्यांनी 'शूद्र कोण होते?' या पुस्तकात शूद्रांच्या उत्पत्तीबद्दल ऐतिहासिक आणि शास्त्रीय अभ्यास सादर केला. 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' या ग्रंथात बुद्धांच्या शिकवणीचे तर्कसंगत स्पष्टीकरण केले — समता, करुणा आणि प्रज्ञा यांचा संदेश मांडला. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या स्थापनेवर त्यांच्या अर्थशास्त्रीय संशोधनाचा प्रभाव पडला.

**संविधानकार म्हणून बाबासाहेबांची निर्मिती**

बाबासाहेबांनी घटना समितीच्या मसुदा समितीचे अध्यक्षपद सांभाळले आणि संविधानात स्वातंत्र्य, समता व बंधुता या मूल्यांचा अंतर्भाव केला. बाबासाहेबांनी आपल्या अंतिम भाषणात संविधानाचे श्रेय एकट्याने घेतले नाही - बी.एन. राव यांनी प्रारूप तयार केल्याबद्दल, एस.एन. मुखर्जी यांनी ते कायदेशीर स्वरूपात मांडल्याबद्दल, मसुदा समितीला आणि काँग्रेस पक्षाला धन्यवाद दिला. हीच त्यांची महानता आहे. बाबासाहेब संविधानकार बनले ते कोलंबिया विद्यापीठातून अर्थशास्त्रात आणि लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधून कायद्यात पीएचडी मिळवल्यानंतर. हे कोलंबियातील ज्ञान, जॉन ड्युईचे लोकशाहीचे तत्त्वज्ञान, स्वातंत्र्य-समता-बंधुता हे फ्रेंच क्रांतीचे विचार, बुद्धाची अहिंसा आणि प्रज्ञा, तसेच फुले-शाहूंची सामाजिक सुधारणेची परंपरा - या सर्वांच्या समुच्चयातून बाबासाहेब घडले.

**निष्कर्ष: इतिहासाशी प्रामाणिक राहणे गरजेचे**

किशोरी पेडणेकर यांनी केलेला दावा सुहृदपणे केलेला असेल; पण तो ऐतिहासिक पुराव्यांशी मेळ खात नाही. मनाचे श्लोक आणि रामदासी परंपरा ही बाबासाहेबांनी आव्हान दिलेल्या ब्राह्मणी सामाजिक रचनेशी निगडित आहे.बाबासाहेबांना घडवले ते तीन गुरूंनी - भगवान गौतम बुद्ध, संत कबीर आणि महात्मा जोतिबा फुले - हे स्वतः बाबासाहेबांनीच सांगितले आहे. केळुसकरलिखित बुद्धचरित्राने बाबासाहेबांच्या जीवनाची दिशाच बदलली, हे ऐतिहासिक सत्य आहे.बाबासाहेबांवर प्रभाव पाडला तो ज्ञानाने - शोषणमुक्त विचारांनी, समतेच्या तत्त्वज्ञानाने, जगभरातील संविधानांच्या अभ्यासाने. मनाचे श्लोकांनी नव्हे. बाबासाहेबांच्या जयंतीच्या काळात त्यांच्याबद्दल ऐतिहासिकदृष्ट्या सत्य आणि प्रामाणिक माहिती सांगणे हीच त्यांना खरी आदरांजली आहे.

# पाळधीतील कासट परिवार : उद्योग, समाजसेवा आणि विश्वासाचा 'वटवृक्ष'!

**धरणगाव तालुक्यातील पाळधी हे छोटेसे गाव. साधी जीवनशैली, मर्यादित साधनसामग्री आणि ग्रामीण वातावरण—पण याच मातीने घडवला एक असा उद्योगसमूह, ज्याने आपल्या कर्तृत्वाने राज्यभर आणि देशाच्या विविध भागांमध्ये विश्वासाचे अधिराज्य निर्माण केले. हा प्रवास आहे कासट परिवाराचा—उद्योग, समाजसेवा आणि राजकारण या तिन्ही क्षेत्रांत आपली ठाम छाप उमटवणाऱ्या एका प्रेरणादायी कुटुंबाचा.**



श्री. अशोक शिवनारायण कासट | श्री. आशिष अशोक कासट | श्री. अनिल अशोक कासट | श्री. अमर अशोक कासट | चि. श्रीरंग अनिल कासट

आज 'कासट गृप' म्हणजे केवळ एक व्यावसायिक नाव नाही, तर गुणवत्ता, प्रामाणिकता आणि सामाजिक बांधिलकीचे प्रतीक बनले आहे. छोट्या वीटभट्टीपासून सुरू झालेला हा प्रवास आज हजारो कुटुंबांना रोजगार देणाऱ्या आणि समाजात विश्वास निर्माण करणाऱ्या वटवृक्षात परिवर्तित झाला आहे.

**यशाचा पाया : परिश्रम, जिद्द आणि दूरदृष्टी**

कासट परिवाराच्या यशाची कहाणी ही एका सामान्य माणसाच्या असामान्य जिद्दीची आहे. या प्रवासाची सुरुवात अशोक शिवनारायण कासट यांनी अत्यंत लहान प्रमाणात व्यवसाय सुरू करून केली. सुरुवातीला कष्ट, संघर्ष आणि अनेक अडचणींचा सामना करत त्यांनी वीटभट्टी आणि क्रशर व्यवसायात पाय रोवले. त्यांच्या परिश्रम, प्रामाणिकता आणि दूरदृष्टीमुळे व्यवसाय हळूहळू वाढत गेला. त्यांनी कधीही गुणवत्तेवर तडजोड केली नाही. ग्राहकांचा विश्वास जिंकणे आणि तो टिकवून ठेवणे हेच त्यांचे मुख्य ध्येय राहिले.

हीच परंपरा पुढे नेत अनिल अशोक कासट आणि आशिष अशोक कासट यांनी व्यवसायाला अधिक व्यापक रूप दिले. आधुनिक तंत्रज्ञान, व्यवस्थापन कौशल्य आणि नव्या संधींचा शोध घेत त्यांनी 'कासट गृप'ला नव्या उंचीवर नेले. आता चौथ्या पिढीतील अमर आशिष कासट आणि श्रीराम अनिल कासट हे तरुण नेतृत्व व्यवसायात नवे प्रयोग करत पुढे नेत आहेत.

उद्योगांचा विस्तार : एक मजबूत व्यावसायिक जाळे

कासट परिवाराने केवळ वीट, वाळू आणि खडी या पारंपरिक व्यवसायावर समाधान मानले नाही. त्यांनी विविध क्षेत्रांमध्ये आपला विस्तार करत एक व्यापक उद्योगसमूह उभारला आहे.'कासट ब्रिक्स', 'कासट इन्फ्रा', 'रिद्धी स्टोन इंडस्ट्रीज', 'अमर ट्रेडर्स', 'सुकृती बिल्डकॉन', 'हॉटेल गोविंद', 'ए.एस.के. प्रोस्थेटीक' यांसारख्या विविध संस्थांद्वारे त्यांनी बांधकाम, इन्फ्रास्ट्रक्चर, व्यापार आणि सेवा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. आफ्रिकेतही 'लायन इन्फ्रा'च्या माध्यमातून त्यांनी आपली उपस्थिती दर्शवली आहे.

या सर्व उद्योगांमुळे सुमारे चार हजारांहून अधिक लोकांना



रोजगार मिळाला आहे. ग्रामीण भागातील बेरोजगारी कमी करण्यासाठी हे योगदान अत्यंत महत्त्वाचे ठरते.

**गुणवत्तेवर ठाम विश्वास : यशाचे खरे गमक**

'कामात गुणवत्ता आणि वागण्यात विश्वास' हे कासट गृपचे ब्रीदवाक्यच जणू त्यांच्या यशाचे रहस्य आहे. त्यांच्या वीट, वाळू आणि बांधकाम साहित्याची गुणवत्ता हीच त्यांची ओळख बनली आहे. सावदा येथे तब्बल ५० एकर क्षेत्रावर उभारलेला भव्य क्रशर प्रकल्प, चांदसर रस्त्यावर सुरू केलेला आधुनिक वीट व वाळू प्लांट आणि मुक्ताईनगर येथील अत्याधुनिक यंत्रसामग्री या सर्वांमुळे उत्पादनात सातत्याने सुधारणा झाली आहे.

विशेष म्हणजे पर्यावरणपूरक वाळू आणि शेतातील टाकाऊ पदार्थांपासून तयार होणाऱ्या मजबूत वीटा ही त्यांच्या व्यवसायाची वैशिष्ट्ये आहेत. पर्यावरण संवर्धन आणि उद्योग यांचा समतोल साधण्याचा त्यांचा प्रयत्न कौतुकास्पद आहे.

**शासकीय कंत्राटदार म्हणून नवी ओळख**

गेल्या काही वर्षांत कासट परिवाराने शासकीय कंत्राटदार म्हणूनही आपली ओळख निर्माण केली आहे. विशेषतः महामार्गावरील रस्ते बांधणी क्षेत्रात त्यांनी दर्जेदार काम करून सरकारी यंत्रणांचा विश्वास संपादन केला आहे. काँक्रीट रस्त्यांच्या बांधणीत गुणवत्ता, टिकाऊपणा आणि वेळेचे काटेकोर पालन यामुळे त्यांची कामे वेगळी ठरतात. 'जनतेचा विश्वास जपणे' हेच ध्येय ठेवून ते प्रत्येक प्रकल्प पूर्ण करत आहेत.

**समाजसेवा : कर्तव्याची जाणीव**

कासट परिवाराचा खरा मोठेपणा केवळ उद्योगात नाही, तर समाजसेवेत आहे. त्यांनी व्यवसायातून मिळालेल्या यशाचा उपयोग समाजासाठी करण्याचा मार्ग निवडला. आरोग्य शिबिरे, शिक्षणासाठी मदत, धार्मिक स्थळांच्या बांधकामासाठी योगदान, गरजू कुटुंबांना मदत अशा विविध उपक्रमांमधून त्यांनी समाजाशी आपले नाते अधिक घट्ट केले आहे. मंदिर, मस्जिद अशा सर्व धर्मांच्या स्थळांसाठी त्यांनी वीट, वाळू आणि आर्थिक मदत दिली आहे. यामुळे त्यांच्या कार्यात धार्मिक सौहार्दाची झलक दिसून येते.

**राजकीय क्षेत्रातील सहभाग : लोकाभिमुख नेतृत्व**

कासट परिवाराने राजकीय क्षेत्रातही सक्रिय सहभाग नोंदवला आहे. शरद शिवनारायण कासट यांनी तब्बल ४० वर्षे गावाच्या विकासासाठी काम करत सरपंचपद भूषवले. त्यांच्या कार्यकाळात पाळधीच्या विकासाला गती मिळाली.

यानंतर अनिल अशोक कासट यांनी उपसरपंच म्हणून आणि सध्या ग्रामपंचायत सदस्य म्हणून उल्लेखनीय कामगिरी केली आहे. ते युवा नेतृत्व म्हणूनही पुढे येत असून, गावाच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न करत आहेत.

त्यांच्या लोकाभिमुख कार्यामुळे आगामी निवडणुकांमध्ये ते जनतेच्या आशेचा किरण म्हणून पाहिले जात आहेत.

**विश्वासाचा पाया : लोकांशी जिव्हाळ्याचे नाते**

कासट परिवाराची सर्वात मोठी ताकद म्हणजे लोकांशी असलेले जिव्हाळ्याचे नाते. जनतेच्या सुख-दुःखात धावून जाणे, अडचणीच्या काळात मदतीचा हात देणे आणि प्रत्येकाशी प्रामाणिकपणे वागणे यामुळे त्यांनी लोकांच्या मनात विशेष स्थान निर्माण केले आहे. त्यांचा स्वभाव साधा, वागणूक प्रामाणिक आणि कार्यशैली पारदर्शक असल्याने लोक त्यांच्यावर विश्वास ठेवतात.

**प्रेरणादायी प्रवास : ग्रामीण भागासाठी आदर्श**

कासट परिवाराचा प्रवास हा ग्रामीण भागातील तरुणांसाठी प्रेरणादायी आहे. कमी साधनसामग्रीतून मोठे यश मिळवता येते, याचे ते जिवंत उदाहरण आहेत. त्यांनी दाखवून दिले की, परिश्रम, गुणवत्ता आणि प्रामाणिकता यांच्या जोरावर कोणताही व्यवसाय उंची गाठू शकतो.

**निष्कर्ष : उद्योग, समाज आणि विश्वास यांचा संगम**

कासट परिवार हा केवळ एक उद्योगसमूह नाही, तर तो एक विचार आहे—गुणवत्तेचा, सामाजिक जबाबदारीचा आणि विश्वासाचा. छोट्या गावातून सुरू झालेला हा प्रवास आज हजारो लोकांच्या जीवनाला दिशा देत आहे. उद्योगातून रोजगार, समाजसेवेतून आधार आणि राजकारणातून विकास—या तिन्ही क्षेत्रांत त्यांनी उभा केलेला 'वटवृक्ष' आजही अधिक बळकट होत आहे.यशाचा खरा अर्थ केवळ आर्थिक प्रगती नसून समाजाशी असलेली बांधिलकी आहे, हे कासट परिवाराने आपल्या कार्यातून सिद्ध केले आहे. त्यामुळेच 'कासट गृप' हे नाव आज विश्वास, गुणवत्ता आणि प्रेरणेचे प्रतीक बनले आहे.

जन सम्राट टाईम्स सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक : मुकुंदराव शामराव नंन्नवरे
माना की अखबार की लाईफ एक दिन की होती हैं।
मगर उसका असर सालों तक रहता है।
वंचित, शोषित आणि पीडितांचा निर्भीड आवाज बनलेले
जन सम्राट टाईम्स
नव प्रारंभ तसेच स्वागत अंकास खूप खूप सदिच्छा!